दा. क्र. २५०४ अ ३ २५०४ भा. भा. ९१३४ ३-४-५७

शिरीष माला–३

लिली आणि मोगरा

(जगविख्यात लेखकांच्या निवडक कथा)

गुच्छ पहिला

2? APR

२५०४

: अनुवादक :

प्रो. भा. म. गोरे, एम्. ए.,

किंमत आठ आणे

चित्रशाळा प्रकाशन पुणें २.

अनुक्रम

१.	कलेची किंमत (जॉन् गाल्स्वर्दी)	...	१
२.	माझी जमीन् (पर्ल बक्)	...	१५
३.	शाप ! (रड्यार्ड किपलिंग)	...	३७
४.	देवी आणि डोंबारी (अनातोल फ्रान्स्)	...	४८
५.	ओसाडगांवचे इनामदार (रवींद्रनाथ टागोर)	...	५७

IRBK-0102504

IRBK-0102504

तोंड ओळख

शिरीष-मालेतर्फे आज एक नव्या तऱ्हेचें ललित वाङ्मयाचें पुस्तक मराठी वाचकांच्या हातीं येत आहे. केवळ सामान्य लघुकथांच्या संग्रहापेक्षां वाचकांनीं या संग्रहाकडे जरा निराळ्या दृष्टीनें पाहावें अशी आमची विनंती आहे.

पाश्चात्य वाङ्मयांच्या जगांत सर्वश्रेष्ठ बहुमान म्हणजे **'नोबल पारितोषिक'** मिळविणें हा समजला जातो हें सर्वश्रुतच आहे. हीं नोबल पारितोषिकें वाङ्मय, विज्ञान आणि विश्वशांति या क्षेत्रांतील श्रेष्ठ कार्यकर्त्यांना दरवर्षी दिलीं जातात (जागतिक महायुद्धाचीं वर्षें खेरीज करून). वाङ्मय-शाखेंतील अशा पारितोषिक विभूषित लेखकांच्या कांहीं कथांचीं संक्षिप्त सुटसुटीत भाषांतरें यां संग्रहांत वाचकांपुढें ठेवलीं आहेत. संग्रहाची ही कल्पना श्री. त्र्यं. र. देवगिरीकर यांची असून वाचकांना ती पसंत पडेल असा आमचा विश्वास आहे.

मूळ कथांतील नांवें, प्रादेशिक व सांसारिक विशेष मुद्दाम मुळाबर-हुकूम ठेवले आहेत. यामुळें त्या त्या देशांतील जीवनाचें अल्पदर्शन इकडील वाचकांना होईल. असें असलें तरी भाषांतर मात्र शब्दास शब्द आणि वाक्यास वाक्य ठेवून केलें नाहीं. असें भाषांतर केवळ यांत्रिक, ठोकळेबाज आणि सत्त्वहीन होतें असा अनुभव आहे. शब्दशः नव्हे तर यथार्थ भाषांतर व्हावें याकडे विशेष लक्ष दिलें आहे. उदाहरणार्थ बोल-भाषेंतील वाक्प्रचारांचें केवळ भाषांतर केलें तर तें हास्यास्पद होईल.त्याऐवजीं त्यांना समांतर, समानार्थी असे मराठींतील वाक्प्रचार उपयोजिले आहेत. असो.

संग्रहांतील कथांच्या निवडीबद्दल सर्वांचें एकमत होणें अशक्यप्राय गोष्ट आहे. तरी अगदीं चोखंदळ दृष्टीलाहि यांतील एखादी तरी कथा हवीशी

वाटेल अशी अपेक्षा आहे. जीवनांतील विविध पैलूंचें दर्शन व्हावें अशा हेतूनें या कथा निवडल्या आहेत. त्यांतहि दुसरा विशेष म्हणजे मराठींत सामान्यपणें विपुल असलेल्या विनोदी आणि प्रणयप्रधान कथांच्या नमुन्याच्या कथा वगळून, नव्या वानगीच्या कथा निवडल्या आहेत. वाचकांना त्या नावीन्यपूर्ण वाटतील या आशेबरोबर मराठी कथा-लेखकांनाहि त्या उद्बोधक व उत्तेजक वाटोत अशी आशा करून ठेवतों. जागेच्या अभावामुळें अनेक स्थळीं संक्षेप केला आहे.

यांत्रिक युगांतील विपुल उत्पादन, आणि कलात्मक, वैयक्तिक कारागिरी यांचा झगडा गाल्स्वर्दीनें कुशलतेनें रेखाटलेला आढळेल. त्यांतील 'गेस्लर' चांभाराची व्यक्तिरेखा किती ठशठशीत आहे ! 'माझी जमीन' हें पर्लबक्‌च्या 'गुड-अर्थ' चें संक्षेपरूप एक प्रयोग म्हणून येथें समाविष्ट केलें आहे. या जगविख्यात, जानपद कादंबरींतून चिनी शेतकऱ्याचें जीवन भल्या बुऱ्या सर्व प्रकारांसहित हुबेहूब रेखाटलेलें आहे. ही कथा येथें थोडक्यांत आणली आहे. ती इकडील वाचकांना नावीन्यपूर्ण वाटेलच, परंतु हिंदी व चिनी शेतकऱ्यांच्या जीवनांतील साम्यविरोध लक्षांत येऊन संस्मरणीय वाटूं लागेल.

'शाप' ही रड्यार्ड किपलिंगची कथाहि निराळ्या वळणाची आहे. किपलिंगच्या साम्राज्यवादी व अहंकारी कथांकडे आपण दुर्लक्ष केलें तरी चालेल; परंतु अशा परक्या लेखकानें येथें येऊन, पेशावरच्या पठाणांपासून बंगाली बाबूपर्यंत विविध लोकांच्या जीवनांतील प्रसंग रंगवावे, दिल्ली सिमल्याच्या देशी, युरोपियन अधिकाऱ्यांपासून, नागड्या उघड्या जंगली जातींपर्यंतचे जीवनविशेष ठसठशीतपणें रंगवावेत, त्यांच्या चालीरीति, स्वभाव, बोलण्याच्या लकबी, व्यक्तिविशेष अविस्मरणीय रीतीनें, सहजपणें रेखाटून जावेत—यांत आमच्या ललितलेखकांना कांहींच विचार करण्यासारखें दिसत नाहीं ? या कथेंतील मिशनऱ्याच्या फजितीला वाचक क्षणभर हसेल, परंतु एक ठिकाणीं अपयश आलें तर दहा ठिकाणीं यश मिळवून, हे लोक आपण विसरलेल्या या जातींवर किती चिकाटीनें आपला पगडा बसवीत आहेत या विचारानें मन क्षुब्ध झाल्याशिवाय राहणार नाहीं.

पत्रं, पुष्पं, फलं, तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।

हें तत्त्वज्ञान माहीत असलेल्या वाचकांना अनातोल फ्रान्स यांची 'देवी आणि डोंबारी' ही कथा सहज पटेल. आधुनिक तर्ककर्कश काळांतहि अशी श्रद्धापूर्ण कथा लिहितां येते. यावरूनहि......

पारितोषिक-विभूषित पाश्चात्य लेखकांच्या श्रेणींत रवींद्रनाथासारखा हिंदवी लेखक मानानें स्थानापन्न झाला आहे याची जाणीव 'ओसाड-गांवचे इनामदार' या त्यांच्या कथेनें खास होईल. विनोदी व्यक्तिचित्र काढीत असतां त्याला हलक्या हातानें कारुण्याची विरळ झूब कशी कला-पूर्ण रीतीनें दिली आहे हें पाहण्यासारखें आहे. असे इनामदार आज महाराष्ट्रांतील खेड्यांतहि कुठें कुठें आढळून येतील. असो.

नोबल पारितोषिक मिळविलेल्या विशेष परिचित लेखकांच्या कांहीं कृति आम्हीं मराठी वाचकांपुढें संक्षेपानें ठेवल्या आहेत. त्या त्यांना आवडल्याचें दिसून आलें तर अशाच दुसऱ्या, पण इकडे विशेष परिचित नसलेल्या युरोपीय लेखकांच्या निवडक कृतींचा नवा हप्ता वाचकांच्या सेवेस हजर करण्याचें आश्वासन देऊन त्यांची रजा घेतों.

विलिंग्डन कॉलेज,
सांगली
१९४६

भा. म. गोरे

आल्फ्रेड नोबल

'नोबल प्राईझ' या जगन्मान्य पारितोषिकाचें नांव व त्याबद्दलची थोडीशी माहिती अनेकांना असूं शकेल, पण ज्याच्या उदार देणगीतून हें पारितोषिक निर्माण झालें त्या आल्फ्रेड नोबल यांची माहिती मात्र अनेकांनाहि असूं शकणार नाहीं.

आल्फ्रेड नोबल याचा जन्म पिढीजाद एंजिनीयर आणि शास्त्रज्ञांच्या घराण्यांत, स्टॉकहोम येथें, २१ ऑक्टोबर १८३३ रोजीं झाला. त्याचे वडील इमॅन्यूएल हे 'प्लायवुड' या लाकडी तक्त्याच्या शोधाचे जनक होत. पुढें रशियाच्या आश्रयाखालीं हें कुटुंब पीटर्सबर्ग येथें जाऊन राहिलें. तेथें इमॅन्यूएल् हा एक स्फोटक द्रव्याचे प्रयोग करण्यांत गर्क असे.

यापूर्वी अशा स्फोटक द्रव्यांत नायट्रो-ग्लिसरीन हा पातळ पदार्थ प्रमुख गणला जाई.याचा शोध १८४७मध्यें सोब्रेरो या इटालियन शास्त्रज्ञानें लावला. प्रचंड शक्ति अंगीं असूनहि या स्फोटक तेलामुळें उपकाराऐवजीं अपकार होण्याचा संभवच्च फार.कारण जरा धक्का लागला कीं सारा कारखानाच्च अंतराळांत उडून जायचा! एका गलबताची अशी वाट लागलीहि होती.

आल्फ्रेड नोबल याचें शिक्षण घरीं खाजगीं शिक्षकाच्या देखरेखीखालीं झालें. तें बरेंच प्रगत झाल्यावर तोहि पिढीजाद व्यवसायाला लागला. त्याच्यापुढें मुख्य कूटप्रश्न उभा राहिला तो असा. नायट्रो-ग्लिसरीन या स्फोटक पदार्थाची प्रचंड शक्ति तर कायम ठेवायची, परंतु तिला अशी वेसण घालायची कीं तिला भलत्याच स्थळींकाळीं विध्वंस माजवितां येऊं नये. यासाठीं प्रथम त्यानें एका प्रकारच्या वाळूचें मिश्रण या तेलांत करून असून कांड्या बनविल्या. 'डायनामाइट' पेटंट नांवानें त्या प्रसिद्ध त्यांच्या अजून त्यांचा कुठें कुठें उपयोग केला जातो. डायनामाइट हें नायट्रो-ग्लिसरीनपेक्षां कमी धोक्याचें असलें तरी तें दगडापेक्षां वीट मऊ या न्यायानेंच. या डायनामाइटचे प्रयोग चालू असतांनाच एक प्रचंड स्फोट होऊन आल्फ्रेडचा भाऊ ओस्कार हा ठार झाला.

या घटनेनें आल्फ्रेड नोबलला फार मोठा धक्का बसला. आतां डायनामाइटची दुरुस्ती एक शास्त्रीय, तात्त्विक प्रश्नच नसून तें जिव्हाळ्याचें कर्तव्यच होऊन बसलें.

आपण आपल्या कुवतीप्रमाणें कांहीं कांहीं करीत असतों, परंतु त्याची अखेरी दैवाधीनच असते. आकस्मिक, दैवाधीन प्रसंगानें मोठमोठे शोध कसे लागले याचा इतिहास कोणी लिहिला तर तो फार मनोरंजक होईल. न्यूटनचें कपाळ शेकणाऱ्या सफरचंदानें गुरुत्वाकर्षणाचें तत्त्व स्फुरविलें, तर उकळत्या किटलीच्या फडफडत्या झांकणानें वॅटला वाफेच्या इंजिनांची कल्पना दिली असें म्हणतात. या गोष्टी खऱ्या मानल्या तर एका कापल्या करंगळीनें नोबलला सुरक्षित स्फोटक द्रव्याचा शोध लावून दिला असें कां म्हणूं नये ?

एकदां त्याचें बोट कापलें असतां त्यावर त्यानें कोलोडियन (Collodion) चे थेंब ओतले. या द्रव्याचा एक घट्ट थर लवकरच तयार होऊन त्यामुळें जखमेचें संरक्षण होतें. घट्ट होत असलेल्या या द्रव्याकडे पाहात असतां नोबलच्या डोक्यांत एकदम एक कल्पना चमकून गेली. नायट्रो–ग्लिसरीनमध्यें हें कोलोडियन मिसळून त्याचा एक घट्ट गोळा बनविला तर ? चटकन् त्यानें तें मिश्रण तयार केलें. प्रयोगांतीं हा पदार्थ संपूर्णतया यशस्वी ठरला. त्याची स्फोटक शक्ति भयंकर असूनहि, नायट्रो–ग्लिसरीन किंवा डायनामाइटप्रमाणें त्याचा सहजासहजी स्फोट होऊं शकत नाहीं. Blasting Gelatine व इतर नांवांनीं हा पदार्थ बाजारांत आला.

आल्फ्रेड नोबलनें स्फोटक पदार्थ तयार करण्याचे अनेक कारखाने निरनिराळ्या देशांत काढून कोट्यवधि रुपये मिळविले. पेटंटामुळें या पदार्थांची मक्तेदारीच त्याला मिळाली होती. बिनधुराची दारूहि त्यानें पुढें शोधून काढली. या शोधामुळें नोबलचें नांव जगविख्यात झालें. मोठमोठ्या विद्वत्सभांनीं त्याला सन्मानचिन्हें अर्पण केलीं, विद्यापीठांनीं पदव्या दिल्या. पैसा तर काय ?——"अनंतहस्तें कमलावरानें, देतां किती घेशिल दो करानें ?" अशी त्याची स्थिति झाली. परंतु——!

या परंतुची मेख अदृष्टानें आपल्या हातीं ठेवली नसती तर या अपूर्ण जगाचें नंदनवन झालें असतें. पैसा, पदवी, प्रतिष्ठा यांच्या पावसांतहि नोबल कोरडाच राहिला. कंगाल मनुष्याच्याहि सहज आंवाक्यांतलें एक सामान्य सौख्य या कुबेरालाहि अप्राप्त राहिलें. कुटुंबकबिला,

मुलेंबाळें यांचा सहवास त्याच्या कपाळीं लिहिला नव्हता, त्यामुळें तो जन्मभर उदास राहिला. अन्नपचनाची तक्रार असल्यानें जिव्हेचें सौख्यहि त्याला फारसें अनुभवितां आलें नाहीं. आपल्या शोधामुळेंहि त्याला फारसें समाधान मिळालें नाहीं. कडेकपारींचें फत्तर फोडण्यासाठीं, देशांच्या समृद्धीसाठीं त्यानें शोधून काढलेली वस्तु मानवी संहारासाठीं; वापरली जाऊं लागलेली पाहून त्याला फार दुःख होई. तो मनाचें एवढेंच समाधान करून घेई कीं एकदां संहाराची शीग ओलांडली म्हणजे रक्तपाताचा वीट येईल. मानवजात युद्धापासून पराङ्मुख होईल. अशा रीतीनें या शोधामुळें शेवटीं शांततेचा लाभ जगास होईलहि.—कोण जाणे.

विघातक वस्तूंच्या निर्मितींत घालविलेल्या आपल्या जीवनाचा शेवटीं कांहीं विधायक कार्यासाठीं उपयोग व्हावा ही अंतिम इच्छा होती. त्यासाठीं त्यानें दोन कोट रुपयांचा एक निधि बाजूला काढून तो स्वीडिश व नॉर्वेजियन अधिकाऱ्यांच्या ताब्यांत दिला. याचें तीन टक्के दरानें येणारें व्याज स्वतःच्या नांवानें पारितोषिकें वांटण्यांत खर्च करावें अशी त्यानें योजना केली.

वाङ्मय, विश्वशांति आणि विज्ञान या तीन मुख्य शाखांत हीं पारितोषिकें वांटलीं जातात. विज्ञानशाखेंत १ पदार्थविज्ञान, २ रसायन, ३ वैद्यक अशा उपशाखांना हीं पारितोषिकें ठेविलीं आहेत. निरनिराळ्या विद्वत्सभांनीं त्या त्या शाखांतील त्या वर्षीच्या सर्वश्रेष्ठ कार्यकर्त्यांची या पारितोषिकासाठीं निवड करावयाची असते. या निर्णयांत देश, धर्म, वर्ण वगैरे बाबती विचारांत घेऊं नयेत असें त्यानें मुद्दाम नमूद केलें. 'नोबल फाउंडेशन' या संस्थेतर्फे हा सर्व व्यवहार चालत असतो. १९०१ सालापासून हीं पारितोषिकें देण्यास सुरुवात झाली असून जागतिक युद्धाच्या काळाखेरीज करून इतर वेळीं दरवर्षी देण्यांत आलीं आहेत. कविश्रेष्ठ रवींद्रनाथ टागोर आणि विज्ञानपंडित चंद्रशेखर रमण या हिंदी नररत्नांना हा मान मिळाला आहे. हें नोबल पारितोषिक मिळविलेल्या कांहीं साहित्यसेवकांच्या कथांचा अनुवाद या पुस्तकांत केला आहे.

१८९६ सालीं '**सॉ रेमो**' येथें (१० डिसेंबर) आल्फ्रेड नोबलचें देहावसान झालें. विधायक वस्तूंच्या शोधाऐवजीं त्याच्या विधायक कार्यांच्या उत्तेजनामुळेंच नोबलच्या नांवाला शेवटीं अमरत्व प्राप्त झालें.

१ : कलेची किंमत

जॉन गाल्स्वर्दी

गेस्लर हा लंडनमधला एक गरीब चांभार. मी त्या मनुष्याला माझ्या बालपणापासून ओळखीत होतों. माझ्या वडिलांचे बूट तोच बनवीत असे. तो गाळ्यांच्या एका दुकानांत एका गल्लींत राहात असे. आतां तो गेला, आणि त्याचें दुकानहि नाहींसं झालं आहे.

त्या जागेला कांहीं विशेष रुबाब होता हें निश्चित, पण त्यांत भडकपणा नव्हता. " **श्रीमंत राजेसाहेब यांच्या खास आश्रयाखालीं** " अशी डौलदार पाटीहि त्या दुकानावर लटकत नव्हती. फक्त—" **गेस्लर ब्रदर्स** " हें स्वत:चं नांव आणि धंद्याची निशाणी म्हणून खिडकींत काचेआड कांहीं बुटांचे जोड. यापलीकडे कोणतीहि जाहिरातबाजी त्यानं कधींहि केली नाहीं.

लहानपणीं मला राहून राहून नवल वाटे कीं हे खिडकींतले बूट आले कुठून ? कारण कोणी आपण होऊन ' ऑर्डर ' दिली तरच बूट बनविणार तो. बरं एखाद्याच्या पायांना बरोबर न येणारे हे बूट म्हणावें तर तशी कल्पनाहि येणें अशक्य, कारण त्याची कारागिरी इतकी उत्तम होती कीं यत्न करूनहि वाईट काम त्याला करतां आलं

नसतं. मग ? खिडकींत ठेवायला त्यानं दुसरीकडून बूट विकत तर आणले नसतील ? छट् ! आपण स्वतः काम न केलेला एक चामड्याचा तुकडाहि त्याच्या दुकानांत त्याला खपत नसे, इतका अभिमान होता त्याला आपल्या कारागिरीचा ! शिवाय ते बूट होते किती सुंदर ! ' पंपशू ' होते ते किती नाजूक अन् पातळ ! पेटंट लेदरचे चकचकीत सुंदर बूट बघून तर मनाला मोहनी पडे. पिवळे उंच घोडदौडीचे बूट इतके तजेलदार होते कीं जणुं शंभर वर्षं वापरल्यामुळें त्यांच्यावर हा गुळगुळीत तजेला आला असावा ! असं वाटे कीं बूट बूट म्हणून ज्या वस्तूची सर्वोत्कृष्ट प्रतिमा अगदीं कित्ता म्हणून मनांत ठेवावी त्याच्या बरहुकूम नमुना म्हणून हे बूट तयार झाले असावे.

हे सारे विचार मला बऱ्याच उशीरानें सुचत गेले. मात्र मी चौदा वर्षांचा झालों आणि माझे पहिले बूट गेस्लरकरवीं तयार झाले तेव्हांसुद्धां माझ्या मनांत तो अन् त्याचा भाऊ यांच्या रुबाबाबद्दल मला आदर होता एवढं मला आठवतं.

त्याच्यासारखे बूट तयार करणं म्हणजे एखादी अद्‌भुत आणि गुप्त कला असावी असं मला वाटे—अजूनहि तसं वाटतं. एकदां मी त्याला लाजत, बुजत तसं म्हणालों हें देखील मला आठवतं एकदां लहानपणीं नवा बूट करण्यासाठीं माप घेण्यासाठीं मी माझा पाय गेस्लरपुढें केला आणि म्हणालें—

—" काय हो ! असे बूट करणं फार अवघड असेल नाहीं ! " लाल दाढीचं जंगल वाढलेल्या त्याच्या चेहऱ्यावर स्मिताच्या सुरकुत्या पसरल्या. तो एवढंच म्हणाला—

—" ती एक कला आहे, कला "

हा गेस्लर बूटवाला लहान अंगाचा अन् कुटकुटीत होता. जसा कांहीं कातड्याचाच बनविलेला असावा तो. त्याचा चेहरा पिवळसर असून सुरकुतलेला होता. त्याचे केस कुरळे अन् लाल–दाढीहि तशीच. त्याचा आवाज बसका आणि सदा एक सुरांतला. त्याचा सारा अवतार अगदीं कातड्यानं केल्यासारखा सुरकुतलेला, ताठलेला अन् मंद ! पण ही झाली त्याच्या चेहऱ्याची गोष्ट. त्याचे डोळे मात्र राखी निळसर छटेचे असून त्यांत एखाद्या ध्येयवाद्यासारखी निश्चयाची झांक दिसत असे.

त्याचा वडील भाऊ जवळ जवळ त्याच्या सारखाच दिसे—फरक इतकाच कीं तो म्हणजे त्याच्या लहान भावाची पुसट प्रतिमा. दोघेहि अंग मोडून काम करणारे; दोघेहि इतके सारखे कीं अर्धे बोलणं संपेपर्यंत हा लहान भाऊ कीं मोठा हें मला नीटपणें सांगतां येत नसे. मग मी एक आडाखा बांधून ठेवला. " भाऊला विचारून सांगेन " असं गुटमळत बोलेल तो मोठा भाऊ. तसं न बोलेल तो धाकटा भाऊ !

मी मोठा झालों. उधळेपणानं कितीतरी दुकानदारांची उधारी वाढवीत गेलों, पण या गेस्लरची उधारी ठेवण्याचा मात्र मला धीर होत नसे. फार तर एक दोन बूटजोड्यांचे पैसे अंगावर असतील तेवढेच. अशी उधारी ठेवून, त्याच्यापुढें नव्या बुटासाठीं पाय पसरणं; साध्या लोखंडी काड्यांच्या चष्म्याआडच्या त्याच्या निळ्या, लुकलुकणाऱ्या डोळ्यांना डोळा देणं अन् पुन्हां त्याचं गिऱ्हाईक म्हणून मिरवणं या गोष्टी अवघडच होत्या.

गेस्लरच्या दुकानाची वारी करण्याचे प्रसंग मात्र वारंवार येत नसत, कारण त्याची एकेक बूटजोडी वर्षानुवर्षं टिके.

गेस्लरच्या दुकानाचं वातावरणच न्यारं होतं. दुसऱ्या दुकाना-सारखं, घाईघाईनं शिरून, 'माल द्या म्हणजे हा निघालों' असा धसमुसळेपणाचा कारभार तिथं करवतच नसे. एखाद्या देवळांत आपण जसे शांतपणें जातों तसं तिथं जावं; तिथल्या एकुलत्या एक लाकडी खुर्चीवर बसावं अन् शांतपणं वाट पाहावी, असा क्रम असे. कारण दुकानांत कोणी कधीं नसायचंच! मग बराच वेळ झाला म्हणजे त्या विहिरीसारख्या खोल अंधाऱ्या दुकानाच्या वरच्या मजल्याच्या कांठाशीं गेस्लरचा नाहींतर त्याच्या भावाचा चेहरा डोकावे. वरून टेहळणी होई. मग एक घोगरा घशांतला आवाज येई आणि त्याच्या जोडयांचा टप् टप् आवाज जिन्यावरून खालीं येई, अन् गेस्लरची स्वारी खालीं येऊन समोर उभी राही. अंगांत कोट नाहीं, शरीर वाकलेलं अन् कातडयाचं 'एप्रन' कंबरेला बांधलेलं. जसं कांहीं भर झोंपेंत बुटाचं एखादं स्वप्न बघत असतां कोणी उठवूनच आणलं असावं त्याला. एखाद्या घुबडासारखे त्याचे डोळे उजेडांत सारखे उघडझांप करीत असायचे. आपल्या अंधाऱ्या ढोलींतून या उजेडांत ओढून आणल्याबद्दल राग आल्यासारखी त्याची मुद्रा असे.

मग मीं म्हणावं, "रामराम गेस्लरदादा! रशिया लेदरची एखादी बूटजोडी देतां करून?"

एक शब्द न बोलतां, आला तसा तो वरच्या मजल्यावर परत जाई, नाहींतर दुकानाच्या दुसऱ्या गाळ्यांत शिरे. मी मग खुर्चीत हातपाय पसरून, कमावलेल्या कातडयाचा सुगंध हुंगीत तसाच बसून राही. थोडया वेळानें तो परत येई, तेव्हां पातळ शिरा शिरा दिस-

णाऱ्या त्याच्या हातांत सोनेरी कातडयाचा एक तुकडा असे. त्याच्याकडे पाहात तो म्हणायचा, " बघा किती सुंदर चीज आहे ! " मलाहि त्याची वाखाणणी करावी लागे. इतका प्रकार आटपला म्हणजे मग पुढचा प्रश्न येई, " केव्हां हवेत तुम्हांला बूट ? " माझं नेहमींचं उत्तर म्हणजे " जेव्हां तुम्हांला सवड होईल तेव्हां. "

मग तो म्हणे, " बघा, उद्यां पंध्रा दिसाला दिले तर चालतील?"

मी म्हणे, " ठीक आहे. रामराम. "

कातडयाकडे बघत बघतच तो पुटपुटे, " रामराम. "

मी दुकानाचं दार गांठतों तों पुन्हां जिन्यावर त्याच्या जोडयांचा टप् टप् आवाज येई कीं तो चालला वर आपल्या बुटांच्या सृष्टींत.

ही झाली नेहमींच्या बुटांची गत. पण गेस्लरला माझ्यासाठीं पूर्वी न केलेला एखादा बुटाचा प्रकार करायचा असला म्हणजे मात्र बरंच सव्यापसव्य करावं लागे. माझ्या पायांतला जुना बूट काढून तो हातांत घेऊन तो कितीतरी वेळ बारीक नजरेनं अन् प्रेमानं पाहात राही. मला वाटे कीं त्यानें तो प्रथम तयार केला तेव्हांच्या आनंदाची तो या वेळेला आठवण करीत असावा—अन् त्याच्या या सुंदर कलाकृतीची मी कशी माती केली याबद्दल मला दोष देत असावा.

मग माझा पाय एका कागदावर ठेवून तो दोन तीन वेळ पेन्सिलीनें हळू हळू पाउलाची आकृति रेखाटून घेई. माझ्या बोटांना दाबून, चाचपून कुठें काय पाहिजे त्याची बारीकांतली बारीक छटा आपलीशी करीत असे.

एके दिवशीं मी त्याला म्हणालों, " हें बघा, तुमचा या वेळचा बूट कर्रकर्र आवाज करतोय सारखा. " गेस्लर क्षणभर माझ्याकडे

रोखून पाहातच राहिला. जणूं काय माझे शब्द मी परत घेईन अशाचि त्याची अपेक्षा असावी.

मग तो निश्चयानें म्हणाला—" त्यांचा आवाज व्हायला नको."

" पण होतोय खरा, मग ? "

" नीट वापर व्हायच्या आधीं भिजले होते का ते ? "

" छे छे ! "

मीं असें सांगितल्यावर त्याचे डोळे खालीं वळले. तो त्या बुटांचा भागन् भाग आठवण्याचा यत्न करीत असावा. त्याला इतकं वाईट वाटलेलं पाहून मला अगदीं ओशाळल्यागत झालं. कांहीं बोललों नसतों तर फार बरं झालं असतं असं मला वाटूं लागलं.

तो म्हणाला—" परत पाठवून द्या ती जोडी. मी पुन्हां तपासून पाहीन. "

मला आतां त्या बुटांचीच दया यायला लागली. आतां भरली त्यांची कंबख्ती—टांकान् टांका ढिला होणार त्यांचा.

तो संथपणं म्हणाला, " कांहीं बूट तयार झाल्यापासूनच बिघडलेले असतात. माझ्यानं सुधारले नाहींत तर तुमच्या बिलांतून वजा टाकीन ते ! "

आज किती चर्मकार सांपडतील असे ?

एकदां मी घाईत असल्यानें एका मोठ्या दुकानांतले तयार बूट विकत घेतले होते. ही गोष्ट विसरून मी गेस्लरच्या दुकानांत नव्या बुटांची ऑर्डर द्यायला गेलों; ते बाजारी बूट पायांत घालूनच. यावेळीं गेस्लरनं कांहीं न बोलतां, कातड्याचा नमुना न घेतां, माझी ऑर्डर नोंदून घेतली. त्याची भेदक नजर माझ्या बाजारी बुटांचं कातडं भेदून

आरपार जात होती. शेवटीं तो तुटकपणानं एवढंच म्हणाला, "हे बूट माझे नव्हत."

त्याच्या शब्दांत राग नव्हता, शोक नव्हता, तिरस्कारहि नव्हता. पण अशी एक चमत्कारिक भावना होती कीं तिनं माझं रक्तच थिजून गेलं. अगदीं फॅशनेबल बांधणी करण्याच्या हव्यासांत डाव्या पायाचा बूट एका जागीं मला सपाटून चावत होता. गेस्लरनं आपलं बोट नेमकं त्या जागेवरच ठेवलं. तो म्हणाला, "इथं बूट अडतोय तुम्हांला, नाहीं?" यापूर्वीं कधीं आपल्या धंद्याच्या अडीअडचणी, दु:ख, हाल यांचा उच्चारहि त्यानं माझ्यापुढं केला नव्हता. पण आज काय झालं कुणाला ठाऊक! त्याच्या मनाचा बांध फुटला. अगदीं काळजांतल्या यातना त्यानं उघड केल्या माझ्यापुढं. तो म्हणाला, "एवढ्या मोठ्या मोठ्या कंपन्या म्हणवतात पण एवढासुद्धां नांवाचा, कामगिरीचा अभिमान नाहीं त्यांना. पण न्याय बघा, सारं काम त्यांच्या वांट्याला जातं—कसं मिळवतात काम माहीत आहे? —जाहिरात, जाहिरातबाजी! खऱ्या इमानी कामानं बिलकुल नाहीं. आम्ही इतकं खपून, इतक्या मायेनं एक एक बूट तयार करतों—तें सारं सारं काम या बड्या कंपन्या ओढून घेताहेत स्वत:कडे. तुम्ही बघतां आहांत, अन् पुढं बघालच काय होईल तें. पोटापुरतंहि काम उरायचं नाहीं आम्हांला. येणारं वर्ष मागल्याला बरं म्हणविणारं असं येतं. दर वर्षाला आमचं काम कमी कमी होत चाललंय. शेवट काय होणार आहे—तुम्ही आहांतच बघायला!"

त्याच्या या बोलण्यानं मी चरकलोंच. आतां मी त्याच्याकडे निरखून, नव्याच जाणीवेनं पाहिलं. आतांपर्यंत मला कल्पनाहि

नव्हती अशी हालअपेष्टा, निराशा, धडपड त्याच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावर रेखाटलेली स्पष्ट दिसत होती. त्या लाल दाढींत एकाएकीं किती तरी पांढरे केस डोकावूं लागले होते.

मग काय करतां ! मी ते तसले बूट कां अन् केव्हां विकत घेतले हें मीं त्याला आर्जवून सांगितलं. त्याचा तो आवाज, अन् त्याचा तसा चेहरा यांनीं माझ्या मनावर एवढा परिणाम केला कीं मी दुकानांत बसलों होतों तेथवर मी कितीतरी बुटांच्या ऑर्डरी भराभर देत गेलों ! मग व्हायचं तें झालंच. हे सारे बूट झिजतां झिजेनात, फाटतां फाटेनात. जवळ जवळ दोन वर्षेपर्यंत त्याच्या दुकानांत पाय टाकायची जरूरीच पडली नाहीं मला.

शेवटीं मी पुन्हां त्याच्या दुकानाशीं गेलों तर मला धक्काच बसला ! कारण, दोन गाळ्यांतल्या एका गाळ्यावर आतां दुसऱ्याच एका दुकानदाराचं डौलदार सोनेरी नांव झळकत होतं. '**खास राजाश्रयाखालील**' अशी पदवीहि त्यानं लावून टाकली होती. आतां गेस्लरचं दुकान एका अरुंद गाळ्यांतच कसंबसं सामावलं होतं. खिडकींत डौलानं मिरवणारे त्याचे ते सुंदर बूट आतां एका अरुंद कोपऱ्यांत ढीग करून टाकले होते. आधींच लहान असलेलं त्याचं दुकान आतां पूर्वींपेक्षांहि लहान झालं होतं—पूर्वींपेक्षां अंधारलेलं, अन् पूर्वींपेक्षां वासानं भरलेलं. मी आंत गेल्यावर वरच्या माळ्यावरून त्याचा चेहरा डोकवायचा, त्याला पूर्वींपेक्षां कितीतरी आधिक वेळ लागला. जिन्यावरून टप् टप् आवाज करीत येणारे त्याचे जोडे कितीतरी अधिक उशीरानं खालीं उतरले. शेवटीं गेस्लर खालीं आला. आपल्या गंजलेल्या चष्म्याआडून माझ्याकडे पाहात म्हणाला—

“ कोण ? मिस्टर....नाहीं का ? ”

मी अडखळत म्हणालों, “ हें बघा, गेस्लरदादा ! तुमचे बूट चांगले असतात, असायला हवेत त्यांच्यापेक्षांहि चांगले असतात. हे बघा, दोन वर्षांपूर्वीचे तुमचे बूट; अजून भक्कम आहेत हे. ” मी पाय पसरून त्याला ते बूट दाखविले. त्यांच्याकडे नजर लावून तो जड आवाजांत म्हणाला—

“ खरं आहे. लोकांना चांगले बूट हवे असतातच कुठें, असं मला वाटायला लागलंय आतांशीं. ”

त्याच्या डोळ्यांतली ठपका ठेवणारी नजर मला सहन होईना. मीं घाईघाईनं विषयच बदलला, आणि म्हणालों,

“ गेस्लरदादा ! तुमच्या दुकानाची ही काय भानगड केलीत ? ”

तो शांतपणं म्हणाला, “ फार खर्च व्हायला लागला म्हणून. बूट हवेत का तुम्हांला नवे ? ”

मला घ्यायच्या होत्या दोन जोड्या, पण मीं तीन जोड्यांची ऑर्डर देऊन टाकली. अन् चटकन् पाय काढता घेतला कारण मला वाटे कीं त्या मनुष्याच्या दृष्टीनें जगांतले सारे लोक त्याच्या विरुद्ध कट करून उठले होते, अन् मीहि त्यांतलाच एक. बूट करायची त्याची कल्पना, त्याची रीत, या साऱ्यांविरुद्ध नव्या व्यापाराचं, नव्या व्यापारी लोकांचं हें बंड होतं.

असले विचार बहुधा अप्रियच असतात. यामुळें मीं बरेच महिने त्याच्या दुकानांत पायच ठेवला नाहीं. पण शेवटीं मलाच वाटायला लागलं कीं, “ जाऊंद्या ! बिचाऱ्याला असं कसं सोडून द्यावं ? जाऊं या आपणच पुन्हां ! कुणी सांगावं, कदाचित् त्या गेस्लरच्या ऐवजीं

त्याच्या वडील भावाचीच गांठ पडेल." वडील भावाची मला मुर्वत वाटत नव्हती; कारण कोणाला दोष देण्याइतकी कुवत त्याच्या स्वभावांत नव्हतीच.

शेवटीं नाहीं होय करतां मी त्याच्या दुकानांत शिरलों. दुरून पाहिलं तर गेस्लरचा वडील भाऊ दुकानांत दिसला, अन् मग मला हायसं वाटलं. मग मी मोकळेपणानं आंत जाऊन म्हणालों, "हं! कसं काय?"

जवळ येऊन त्यानं माझ्याकडं रोखून पाहिलं—अन् मी चरकलों! कारण वडील भावाऐवजीं गेस्लरच माझ्या समोर उभा होता—पण तो इतका फिकटलेला, इतका वयस्क, कीं दुरून तो त्याच्या वडील भावासारखाच दिसला. तो हळू हळू म्हणाला, "माझं ठीक आहे; वडील भाऊ तेवढा वारला! दुकानाचा दुसरा गाळा हातांतून गेला याच्या दुःखानंच उरीं फुटून मेला बिचारा."

मीं हळहळून म्हणालों, "अरेरे! फार वाईट झालं!"

मीं गेस्लरकडे पाहिलं. त्याचं अंग पूर्वीपेक्षां आणखी वांकलं होतं. डोक्यावरचे केस पूर्वींपेक्षां आणखी विरळ झाले होते. तो मध्येंच म्हणाला—

"नवे बूट घेतां का करून? हें बघा किती सुंदर कातडं हातीं आलंय्!"

मीं भराभर कितीतरी जोडयांची ऑर्डर देऊन टाकली. ते हातीं यायला फार दिवस लागले. पण आले ते पूर्वींच्या बुटाहूनहि मजबूत अन् सुंदर! ते कांहीं केल्यानें झिजेनात कीं फाटेनात.

यानंतर मी प्रवासासाठीं परदेशीं गेलों.

२५०६३७ का वा १९३४

3-7-77

मी परत लंडनमध्यें आलों तेव्हां वर्ष उलटून गेलें होतं. झाल्या-बरोबर मी माझ्या जुन्या दोस्ताच्या दुकानांतच पहिल्यानं गेलों. मीं मागं त्याला पाहिलं तेव्हां तो फारतर साठ एक वर्षांचा दिसत असेल. आतां बघितलं तर अगदीं पाऊणशें वर्षांच्या जवळ म्हाताऱ्यासारखा दिसत होता तो ! आतां त्याला माझी ओळखहि पटेना.

माझं मन त्याची स्थिति पाहून हळहळलं. मी म्हणालों, " गेस्लर-दादा ! बूट करावे तर तुम्हीच ! ही जोडी बघा ! वर्षभर वापरतोंय मी. अर्धा युरोप तुडवला मी,पण ते अजून अर्धेदेखील झिजले नाहींत. "

त्यानें कितीतरी वेळ निरखून माझ्या बुटाकडे पाहिलं. बघतां बघतां त्याच्या चेहऱ्यावर समाधानाची—स्थिरतेची छटा पसरली. माझ्या घोट्याला हात लावून तो म्हणाला, " इथं बरोबर होताहेत का ? या बूटजोडीच्या घोट्याशीं बरीच कटकट करावी लागली होती मला. मला आठवतंय आतां. फार मेहनत घेतली होती मीं. "

मीं चटकन् उत्तर दिलं, " अगदीं छान बसताहेत बूट ! "

त्यानें प्रश्न केला, " नवे बूट हवेत ? ऑर्डर दिलीत तर या खेपेला अगदीं लवकर देईन करून. नवं कामच नाहीं बघा ! "

मी चटकन् म्हणालों, " हवेत तर. कितीतरी बूट हवेत मला. अगदीं सगळ्या तऱ्हेचे बूट करून द्या मला. "

गेस्लर म्हणाला, " ठीक. आतां तुमच्या पायावरून नवाच नमुना करून घेतों मी. जरा मोठा झाल्यासारखा दिसतोय तुमचा पाय. " मग अगदीं हळू हळू त्यानं माझ्या पायाची आकृति रेखाटून घेतली. बोटं चाचपीत असतां भ्रमिष्टपणं वर पाहून तो म्हणाला, " माझा भाऊ वारला हें सांगितलं का मी तुम्हांला ? "

तो आतां इतका क्षीण झाला होता कीं आतां मला त्याच्याकडे बघवेना. तिथून निघालों तेव्हां मला हायसं वाटलं.

यानंतर कितीतरी दिवस गेले. त्या बुटांची मीं आशाच सोडली होती. अशांत एक दिवशीं माझ्या घरांत एक पार्सल आलं. तें उघडून त्यांतल्या चार बूटजोडया मीं रांगेंत लावून ठेवल्या, आणि एकामागून एक पायांत घालून पाहिल्या. अगदीं शंकाच नको. कातडं, कामगिरी, डौल, सुरेखपणा, बरोबर माप यांत हे बूट कशालाहि हार जाणारे नव्हते. एका बुटाच्या तोंडांत त्याच्या बिलाचा कागद सांपडला. दर, रक्कम सारं पूर्वींसारखंच होतं, पण हें बिल बघून मला धक्काच बसला हें मात्र खरं. यापूर्वीं त्याचीं बिलं यायचीं तीं तिमाहि. त्यापूर्वीं कधीं बिल पाठविलं नाहीं त्यानं. आतां....मी धांवतच खालीं गेलों अन् चटकन् चेक लिहून माझ्या हातानं पोस्टांत टाकून आलों.

यानंतर एक आठवडा लोटला असेल. त्याच्या दुकानच्या छोटया रस्त्यावरून जात असतां मला सहज वाटलं कीं दुकानांत एक खेप टाकून यावी अन् त्याला सांगावं—'अगदीं छान झालेत सारे बूट!'

मी त्याच्या दुकानाशीं आलों तर दुकानावरचं त्याचं नांवं नाहींसं झालेलं दिसलं : खिडकीच्या एका कोपऱ्यांत त्याचे ते नाजूक पंपशू, रायडिंग बूट, पेटंट लेदरचे बूट वगैरे बूट मात्र उदासपणें पडले होते.

माझं मन अगदीं अस्वस्थ झालं. मी आंत गेलों. गेस्लरच्या दुकानाचे दोन्ही गाळे आतां पुन्हां एक झाले होते. एक तरुण आंत उभा राहून देखरेख करीत होता. मीं त्याला विचारलं, "गेस्लरदादा आहेत कां आंत?"

त्यानें माझ्याकडे चमत्कारिक नजरेनं पाहिलं. गुळचट आवाजांत तो म्हणाला, " गेस्लर नाहीं. पण आम्ही आहोंत कीं इथं ! आपला काय हुकूम आहे ? आपल्या सेवेला हजर आहोंत आम्ही. हें दुकान आम्हीं घेतलंय. आमचं नांव पाहिलं असेलच तुम्ही त्या दारावर ! मोठ्या मोठ्या लोकांकडे काम जातंय आमचं—मग आपल्याला ? "

" तें सगळं ठीक आहे हो ! पण गेस्लर ? गेस्लर कुठं आहे ? "

—" अंऽ—गेस्लर होय ? तो मेला " !

" मेला ? —अहो, या बुधवारीं तर त्याच्या हातचे बूट माझ्याकडे आले, अन्...."

" हं फार वाईट झाली गोष्ट. बिचारा उपासमारीनं मेला. "

" बापरे ! " माझ्या तोंडून उद्गार निघाला.

तो मनुष्य म्हणाला, " अर्धवट उपासमारी असं नांव दिलं डॉक्टरनं. हळूहळू झिजत गेला बिचारा. बघा कोणी काय करावं ? त्याची काम करायची रीतच होती तशी. दुकान सारं अंगावर, कोणाची कधीं मदत घ्यायची नाहीं. गिऱ्हाइकांच्या बुटांना दुसऱ्या कोणाचं बोट लागलेलं खपायचं नाहीं त्याला. ऑर्डर मिळाली तरी काम आटपायला कितीतरी वेळ लागायचा त्याला. इतका वेळ कोण वाट पाहणार आहे त्याच्यासाठीं ? झालं एकामागून एक गिऱ्हाईक तुटत गेलं त्याचं—शेवटीं एकदेखील उरलं नाहीं. एक जागीं बसून सदा आपला कामांत दंग. आतां एवढं म्हणायला हवं कीं काम मात्र झकास ! साऱ्या लंडन शहरांत त्याच्यासारखे बूट करणारा कोणी सांपडणार नाहीं. पण नुसतं काम घेऊन काय करणार, कपाळ ? अहो चढाओढ काय चाललीय जगांत ! ती त्याच्या गांवींहि नव्हती

एका हॉटेलांत खातपीत राहून काढला. पण शेवटीं मनाचा धीर करून तो उठला. वाड्याच्या उंच प्रचंड दाराशीं आला. दरवानाला चिरीमिरी दिल्यावरच त्याचा आंत प्रवेश झाला.

वॅंगच्या घरासारखीं दहावीस घरें आंत मावलीं असतीं एवढा अवाढव्य हा वाडा होता. भोंवतालच्या कमानी, सुरूचे खांब, कातीव कोरीव काम पाहून तो दिपूनच गेला. अशा एका मोठ्या दालनांतल्या मध्यभागीं, उंच व्यासपीठावर, एक म्हातारी अफूची गुडगुडी ओढीत उंची रेशमी कपडे घालून बसली होती. वॅंगनें वांकून डोकें टेकून तिला नमस्कार केला. तिनें एका मोलकरणीकडून त्या दासीला बोलावून पुढें उभें केलें. तिचें नांव ' ओ–लान्. '

वॅंगनें तिच्याकडे रोखून पाहिलें. ती सुंदर नव्हती. तिचे पाय बांधलेले नव्हते. परंतु तिच्या तोंडावर देवीचे वण नव्हते, किंवा एखादें व्यंगहि नव्हतें. साधीसुधी पण नाकींडोळीं नीटस, ओबडधोबड बांध्याची ती मुलगी होती.

वॅंग आणि ओ-लान् यांना शेजारीं उभें करून त्या वृद्ध स्त्रीनें त्यांना निरोप देतांना माहिती दिली. ती म्हणाली, " ही मुलगी दहा वर्षांची असतांना आमच्या घरांत आली. आतां वीस वर्षांची आहे ती. दुष्काळांत, शांटुग प्रांतांतून आलेल्या लोकांकडून मीं तिला विकत घेतली होती. ती स्वभावानं चांगली आहे, कष्टाळू आहे अन् चांगल्या आचरणाची आहे. "

ती ओ-लान्‌ला म्हणाली, " आतां जा. तुझ्या नवऱ्याची आज्ञा पाळ. मुलं बाळं होऊं देत. पहिलं मूल झालं म्हणजे मला दाखवायला आण. "

वाँगनें तिची पेटी उचलून घेतली. दोघें घराकडे निघालीं. ओ-लान् अगदीं अबोल दिसली. वाँगच्या मागोमाग ती खालीं मान घालून चालत होती. घरीं परतण्यापूर्वीं कुलदेवतेच्या छोट्या देवळांत जाऊन त्यांनीं जोड्यानें नमस्कार केला. मूर्तींपुढें धूप जाळला.

वाँगच्या घरीं त्याचा काका, पुतण्या आणि इतर इष्टमित्र, सगे-सोयरे यांना जेवणाचें आमंत्रण होतें. साध्यासुध्या सामुग्रींतूनहि ओ-लान्नें असा सुरेख स्वयंपाक केला होता कीं साऱ्यांनीं त्याची तोंडभर स्तुति केली. वाँगलाहि समाधान वाटलें. रात्रीं सारे पाहुणे गेल्यावर वाँगनें आंतल्या खोलींत जाऊन पाहिलें तर ओ-लानचा पत्ताच नव्हता. शेवटीं बैलाच्या गोठ्यांत, गवताच्या ढिगांत ती झोंपलेली आढळली. वाँगनें तिला उठवितांच, कोणी आपल्याला एखादा तडाखाच देणार आहे अशा आविर्भावानें तिनें हातानें तोंड झाकलें. वाँगनें तिच्या हाताला धरून तिला आपल्या खोलींत नेलें.

— २ —

आतां ओ-लान्च्या रूपानें वाँगच्या घरांत लक्ष्मीच आली होती. घरचें कोणतेंहि काम त्याला बघावें लागत नसे. तीच सर्वांआधीं उठून पाणी तापवी. वाँगला चहा देई, त्याच्या वडिलांना ऊन पाणी देई. घरकाम आटपलें म्हणजे भोंवतालीं भटकून जळण जमा करी. त्याच्या घरचे जुने मळके फाटके सारे कपडे धुवून, शिवून, स्वच्छ करून तिनें नव्यासारखे केले. साऱ्या घरांत केरसुणी फिरली : लक्ष्मी आली.

एकदां वाँग कुदळ घेऊन शेतांत काम करीत होता. दमून भागून टेकीस आला होता. त्यानें वर पाहिलें तर ओ-लान् हळूच येऊन त्याच्या

मागें उभी. तिनेंहि कुदळ घेतली. वाँगच्या बरोबरीनें ती घावाला घाव देऊं लागली. काळी, मऊ जमीन घावासरशीं उलगडत होती. ढेकळावर वाँग आणि ओ-लान्‌चा घाम गळत होता. या कठोर श्रमांतहि वाँगला समाधान वाटत होतें--धन्यता वाटत होती.

वाँगच्या घराण्याची ही जमीन. ते जन्मले तिथें, मेल्यावर पडलेहि तिच्याच कुशींत. घरेंदारें, जनावरें, मुलेंबाळें—सारीं या जमिनीमुळें, या जमिनीच्या कृपेवर. जमीन म्हणजे जीवन. जमीन म्हणजे संपत्ति.

अशांतच ओ-लान्‌ला दिवस गेले. आपण बाप होणार म्हणून वाँगला अभिमान. आजोबा होणार म्हणून वाँगच्या बापाला आनंद. वाँगला काळजी पडली. घरांत बायको माणूस-कोणी मदतीला नव्हतें. मदतीसाठीं कोणाला बोलविण्याचेंहि ओ-लान्‌नें नाकारलें. तिनें स्वतःच तिचें बाळंतपण उरकलें. बांबूच्या पातळ कामटीनें नाळ कापली. तशा श्रमांतहि तिच्या तोंडावर आनंद होता, अभिमान ओसंडत होता. कारण तिला मुलगा झाला होता ! वाँगनें गांवांत जाऊन तिच्या खिरीसाठीं शेरभर साखर आणली. लाल रंग दिलेलीं अंडीं इष्टमित्रांत वांटलीं. कुलदेवतेची पूजा केली.

बघतां बघतां ओ-लान् पुन्हां वाँगबरोबर शेतांत खपूं लागली. दोघें काम करीत असतां वाँगचा मुलगा शेतांतच एका रकटयावर मजेने हंसत पडे. तो रडूं लागला कीं ओ-लान् तिथेंच त्याला मांडीवर घेऊन पाजी. तिच्या दुधाचे पाट वाहात-पुन्हां जमिनींत ओघळत जात. हा मुलगा पाहतां पाहतां चांगला बाळसेदार गुटगुटीत झाला. त्याचेंहि नांव वाँग.

सुगी झाली. वाँगची झोपडी भरून ओसंडेल इतकें धान्य आतां त्याच्या घरांत सांठलें होतें. कणग्या भरल्या होत्या. कांदे वाळवून

ठेवले होते. जवळ साठवून ठेवलें होतें. याउलट त्याच्या काकाच्या घरांत सारा उधळा कारभार, आणि हिंवाळा आला म्हणजे अन्नान्न-दशा. पण हिंवाळा येऊनहि वॅांगला कांहीं वाण भासली नाहीं. त्यानें औतें दुरुस्त केलीं, ओ-लाननें भांडींकुडीं नवीं केलीं. वर्षाच्या बेग-मीचें धान्य घरांत राहूनहि पसाभर रुपये वॅांगजवळ शिल्लक राहिले.

वॅांगच्या घरीं खरोखरच लक्ष्मी आली होती.

—२—

नव्या वर्षादिवशीं वॅांगनें नातेवाइकांना मेजवानी दिली. ओ-लाननें आपल्या मुलाला चांगले कपडे घातले. दोघे व्हँगच्या वाड्यांत, म्हाताऱ्या धनिणीला भेटून आले. व्हँग घराणें आतां उतरणीला लागलें होतें. वॅांगनेंच आतां त्यांतली कांहीं भातजमीन खरेदी केली.

हळूहळू साऱ्या खेड्यांत बातमी पसरली कीं भिकारडा वॅांग आतां श्रीमंत झाला होता. व्हँग घराण्यांतलि सुपीक भातखाचरं त्यानेंच विकत घेतलीं होतीं. वॅांगचा काका आतां त्याच्याकडे हात पसरी, नात्याच्या हक्कानें पैसे घेऊन जाई.

अशीं वर्षें चाललीं. पहिल्या मुलाच्या पाठीवर मुलगा, त्याच्या पाठीवर मुलगी.

मुलगी म्हणजे संकटाची खाण म्हणतात. ती जन्मली आणि वॅांगचें नशीब फिरूं लागलें.

नांवाचा पावसाळा आला—महिन्यावर महिने लोटूं लागले, पण पावसाचा थेंब पडेना. शेतें वाळून त्यांना भेगा पडल्या. बळेंच पेर-लेल्या धान्याची रोपें वाळून कोळ झालीं. जमिनीवर त्यांचें जीवन. जमीन आटली, रुसली, आणि त्यांचें भाग्यहि रुसलें. घरांतलें धान्य

असलें. नांगरटीचा बैलहि शेवटीं मारून खावा लागला. गरीब लोक तर मुलें-बाळें खाऊन जगत अशा वार्ता कानांवर येत. वाँगजवळ एक चांदीचा तुकडा नव्हता, धान्याचा कण नव्हता, पण त्याच्या मनांत एक समाधानाचा किरण होता—त्याची जमीन तरी त्याची होती.

वाँगचा काका आतां त्याच्या घरीं आला—त्याची जमीन विकत घेणारे दलाल घेऊन. जमीन विकणें वाँगच्या जिवावर आलें—तरी त्यानें सौदा ठरविला. तो पुरा होण्याआधींच नुकतीच बाळंतीण झालेली ओ-लान् आंतून टेकत टेकत बाहेर आली. ती निश्चयानें म्हणाली—" आम्ही भुकेनें मरूं—परागंदा होऊं, पण जमीन विकणार नाहीं. " वाँग आणि ओ-लान् दोघांचें मन एक होतें—दोघांचें दैवत एकच होतें—माझी जमीन !

—४—

शेंकडों, हजारों, भुकेलेले, वखवखलेले लोक खेडीं सोडून दक्षिणेच्या शहराकडे निघाले होते. वाँगनें म्हाताऱ्या बापाला पाठीवर घेतलें, ओ-लान्नें मुलें घेतलीं आणि या हजारोंच्या टोळयांत ते सामील झाले. निकडीसाठीं ठेवलेल्या पैशांत त्यांनीं रेल्वेचीं तिकिटें काढलीं. गुरांच्या डब्यांत बसून ते शहरांत येऊन पोंचले.

शहराबाहेर चार तट्टयांची झोपडी उभारून वाँगनें घर थाटलें. तो रिक्षा ओढी, ओ-लान् आणि मुलें भीक मागत. पैसा पैसा सांठवीत. त्यांच्या पुढें ध्येय एकच........पुरेसा पैसा जमला, पाऊसकाळ आला म्हणजे पुन्हां आपल्या जमिनीकडे जायचें.

म. ग्रं. सं. आचे, वाचनालय शाखा.
दा. क्र. २५०१८ नों. दि.
वि. वाच्य क्र.

शहरांत असतां बरे-वाईट अनेक अनुभव वाँगला आले. श्रीमंतींत ऐदीपणें लोळणाऱ्यापासून रात्रंदिवस काबाडकष्ट करणाऱ्या मजुरापर्यंतचे लोक त्याला दिसले. धर्मोपदेशक, कम्युनिस्ट, व्यापारी, भिकारी, चोर सारे लोक त्या शहरांत आपापलें जीवन जगत होते. पण वाँगचा जीव त्यांत रमत नव्हता. वाँगसारखे हजारों कंगाल त्या शहरांत कुत्र्याचें जिणें जगत होते. बेफाम, बेफिकीर, ऐषारामी जीवन जगणाऱ्या श्रीमंताबद्दल त्यांच्या मनांत द्वेष जळत होता. ते म्हणत, "श्रीमंत जेव्हां अतिश्रीमंत होतात तेव्हां त्यांना धडा शिकवायचाहि एक मार्ग आहे." हा मार्ग कोणता हें वाँगला बराच वेळ कळलें नाहीं. पण शेवटीं एक दिवस असाच आला.......

शहराच्या रस्त्यारस्त्यांतून हजारों शिपाई रांगांनीं कुठेंतरी कवायतीं थाटांत जात होते. शत्रु शहराच्या वेशीशीं आला अशी आवई उठली. सारीं दुकानें बंद झालीं. सगळीकडे आरडाओरड, रडारडी, मारामारी, दंगा, जाळपोळ, लुटालूट ! श्रीमंतांचीं दारं फोडलीं गेलीं. सारे गरीब कामकरी रस्ताभर गर्दी करून लुटालूट करीत चालले. वाँग अशा एका घोळक्यांत सांपडला, ओ-लान् दुसऱ्यांत.

एका मोठ्या श्रीमंत मनुष्याच्या घरांत वाँगचें टोळकें शिरलें. पण चोरीची संवय नसल्यानें वाँगला कशालाहि हात लावावासा वाटेना. त्याला तिथेंच सोडून, सारे दुसरें घर लुटण्यासाठीं धावले.

त्या उध्वस्त झालेल्या श्रीमंतींत वाँग वेड्यासारखा स्तब्ध उभा होता. तेवढ्यांत एक अगदीं लठ्ठ, श्रीमंत मनुष्य दबत दबत बाहेर आला. पण वाँगला पाहून भेदरून उभा राहिला. त्याची बोबडीच वळली "....म....मला ....मारूं नको ....तुला पैसे देतों मी ....

हवे तितके पैसे देतों .... जीव घेऊं नको माझा .... '' अशी तो बडबड करीत होता. आतां वॅंगच्या ध्यानांत सगळा प्रकार आला. तो एवढेंच म्हणाला, " आण पैसे ! "

त्या मनुष्यानें एक मोठी पेटी उघडली. पसा पसा भरून सोन्या-चांदीचीं नाणीं वॅंगच्या पदरांत रिती केलीं—आणि धूम ठोकली. जन्मांत न पाहिलेली संपत्ति उराशीं बांधून घेऊन वॅंग झोपडींत परत आला. त्याला आनंद झाला तो एवढ्यामुळेंच कीं आतां आपल्याला जमिनीकडे जातां येणार !

वॅंगनें एक चांगला बैल विकत घेतला. बीं-बियाणें घेऊन त्यानें आपलें खेडें गांठलें. आपल्याला मिळालेल्या पैशांचा थांग त्यानें कोणा-लाहि लागूं दिला नव्हता. इकडे वॅंगची झोंपडी चोर-लुटारूंनीं उध्वस्त केली होती. घरांत सुतळीचा तोडाहि शिल्लक ठेवला नव्हता कोणी. पण वॅंगला आतां कसली वाण नव्हती. त्यानें आणि ओ-लान्‌नें मिळून झोपडी पुन्हां बांधून काढली. मजबूत औतें विकत घेतलीं.

दक्षिणेकडे जाण्याच्या वेळीं ' चिंग्' नांवाच्या एका गरीब मनुष्यानें ओ-लान्‌ला मूठभर दाणे भर दुष्काळांत दिले होते. वॅंगनें आतां या मनुष्याची दसपट भरपाई केली. त्याला बीं—बियाणें दिलें. त्याची ज़मीन नांगरून दिली.

ओ-लान्‌नें आपल्या चोळींत एक कसलीशी पुरचुंडी लपवून शहरां-तून आणली आहे असें वॅंगला एका रात्रीं आढळलें. तिनें पुरचुंडी सोडून दिव्याच्या उजेडांत आंतल्या वस्तूंचा ढीग केला तर त्यानें त्याचे डोळेच दिपले. कलिंगडाच्या गाभ्यासारखें लाललाल, गव्हासारखे पिवळे-जर्द, गवतासारखें हिरवेंगार अन् झऱ्याच्या पाण्यासारखें नितळ उंची

जवाहिर होतें तें. माणिक, पाचू, हिरे ! ! बिचाऱ्या वाँगला त्यांचीं नांवेंहि ठाऊक नव्हतीं.

—" कुठून आणलेस हे जिन्नस ? "

" एका श्रीमंताच्या घरांतून. सारे पळाल्यावर भिंतींतली एक वीट सुटलेली मला दिसली. तिच्यामागें हें जवाहिर सांपडलं मला. "

वाँगच्या आश्चर्याला पार उरला नव्हता. कधीं नव्हे तें आजच ओ-लान्च्या बुद्धीबद्दल, कर्तृत्वाबद्दल त्याच्या डोळ्यांत आदराची छटा उमटली. त्यानें हळूच विचारलें, ' हें गुपित तुला कसं कळलं ग ?'

—" व्हँगसारख्या श्रीमंताच्या घरांत उगीच दिवस काढले का मीं ? अहो, या श्रीमंतांना चोराचिलटांची सदा भीति. एकदां दुष्काळांत आमच्या वाड्यांत लुटारू शिरले. तेव्हां मीं पाहिलं. साऱ्या बायकांनीं कुठं कुठं खाचखळग्यांत, अडचणीच्या जागांतून आपापले दागिने, जवाहिर दडवून ठेवलं होतं. म्हणून वीट सुटलेली पाहिल्याबरोबर मला वाटलं कीं इथं लाभ आहे. "

जरा वेळानें वाँग म्हणाला, " हें जडजोखीम घरांत ठेवलं तर मला सुखाची झोंप येणार नाहीं. आपण हें देऊन जमीन घेऊंया. तिला कुणाची भीति नाहीं—तिला कोणी चोरणार नाहीं—ती कुठें हरवणार नाहीं. जमीन ! माझी जमिन ! "

तीं रत्नें देऊन टाकतांना ओ-लान्ला फार अवघड वाटलें. शेवटीं त्यांतले दोन मोती वाँगनें तिला कसेबसे दिले. ते जवळ ठेवल्यानेंच तिला बिचारीला समाधान वाटे. कधीं कांहीं जिन्नस करून तिनें ते कानांत देखील घातले नाहींत.

आतां वाँग रुबाबानें व्हँगच्या वाडयांत गेला—त्यांची उरलेली जमीन विकत घ्यायला. व्हँगचें थोर घराणें आतां अगदीं मोडकळीस आलें होतें. थोरला व्हँग सरदार आतां जख्ख म्हातारा होऊन त्या मोठ्या वाडयांत भुतासारखा एकटा राहात होता. कोकिळाबाई म्हणून त्यानें ठेवलेली बाई मधून मधून त्याची कांहीं काळजी घेई तेवढीच. त्याची उरलीसुरली संपत्ति फस्त करण्यापुरतेंच तिचें प्रेम. वाँगची भेट तिनेंच घेतली. जमिनींचा सौदा तिनेंच ठरविला. रोख पैशाऐवजीं जवाहिर, रत्नें घेणेंच तिला अधिक पसंत पडलें—कारण तें सारें तिनेंच गडप केलें. म्हाताऱ्या व्हँगला कोण विचारतो ?

—५—

अशा रीतीनें वाँगनें आतां शेंकडों एकर जमीन खरीद केली. वाँग घराणें पिढ्यान् पिढ्या सुखांत राहील, स्थिर राहील अशी पक्की स्थावर मालमत्ता करून ठेवली. त्याचा जुना, कंगाल परंतु इमानी दोस्त ‘ चिंग ’ याला त्यानें आपला दिवाणजी नेमून टाकलें. सारे नोकर त्याच्या हाताखालीं दिले.

वाँग श्रीमंत झाला. शहरांतल्या मोठमोठ्या व्यापाऱ्यांशीं त्याचा धान्याचा व्यवहार सुरू झाला, परंतु तो स्वतः अक्षरशत्रु होता. म्हणून त्यानें आपल्या मुलाला शाळेंत घातलें. तो घडाघड वाचूं लागला कीं वाँगला मूठभर मांस चढल्यासारखें वाटे. अशा रीतीनें वाँगच्या खांद्या-वरचा कामाचा बोजा हलका झाला. पूर येवो, दुष्काळ येवो, चिंगच्या मेहनतीमुळें वाँगची संपत्ति सदा वाढतीच राहिली.

आतां वाँगला पहिल्यानेंच एक नवा शोध लागला——त्यानें नव्या नजरेनें ओ-लान्‌कडे पाहिलें. तिच्या केसांना कधीं तेल नसे. अंगावर

कधीं झुळझुळीत कपडा नसे. तिचा लांबरुंद चेहरा, फांकलेलें तोंड आणि लोंबता खालचा ओठ पाहून आतां त्याला शिसारी येऊं लागली. आतांपर्यंतच्या तिच्या हालअपेष्टांकडे, तिनें खाल्लेल्या खस्तांकडे आतां त्याचें लक्ष जाईना. तिच्याच जवाहिराच्या जोरावर आपण इतके श्रीमंत झालों याची जाणीव होऊन त्याला स्वतःचाच राग आला. ओ-लान्‌च्या धिम्या, मंद, घुम्या स्वभावाची आतां त्याला अधिकाधिक चीड येऊं लागली.

आतांपर्यंत तो गरीब होता. जमिनीची मशागत करणारा होता. ओ-लान् हें त्याचें सर्वस्व होतें. आतां तो श्रीमंत झाला. जमिनीच्या मशागतीची माती त्याच्या अंगाला लागेना—आतां ओ-लान्‌ला ओलांडून, इतर बायकांकडे त्याची नजर फिरूं लागली.

—६—

त्यांच्या गांवांत एक चहा-घर होतें. खालच्या मजल्यावर चहा-फराळाची सोय होती. वरच्या मजल्यावर वेश्यावस्ती होती. वर राहणाऱ्या बायांचीं चित्रें सज्जावरून लोंबतीं सोडलीं होतीं. कितीतरी लोक इकडे तिकडे पाहून, हळूच जिन्यावरून वर चढून जात. वॅांग मात्र चहाचा कप समोर ठेवून या साऱ्यांकडे हेव्यानें पाहात बसे. वरच्या मजल्यावरून त्या बायकांचीं बोलणीं, गाणीं खालीं ऐकूं येत, त्यांच्या अत्तरांचा घमघमाट सुटे—आणि वॅांगचें चित्त व्यथित होई.

एकदां तो असाच अनिश्चित स्थितींत बसला असतां व्हॅंगच्या वाडयांत त्याला पूर्वीं भेटलेली कोकिळाबाई जिना उतरून येतांना त्याला दिसली. तिनेंहि त्याला पाहिलें. ती जवळ येऊन म्हणाली—

'वा! वॉंग पाटील! तुम्ही का इथं? कोणालाहि खरं वाटणार नाहीं हो!'

वॉंगच्या कपाळावर आठी चढली. तो म्हणाला, "कां? माझ्या पैशाला काय माती लागलीय्? मी कां येऊं नये इथं? खूप पैसा आहे माझ्याजवळ!" कोकिळाबाईचे बारीक डोळे लुकलुकूं लागले. ती आर्जवाच्या स्वरांत म्हणाली, "वा! वा! अहो, पैसेवाल्या लोकांनीं चैन करायची नाहीं तर कोणी करायची? बरं—पण इथं येऊन चहा-वरच भागवायचं का? जरा वर पाहिलं कीं नाहीं? मऊ मऊ गाल—सुंदर सुंदर हात—कधीं अनुभव आहे अशा अप्सरांचा? वर तर बघा? या अप्सरांपैकीं कोणाचा सहवास हवाय्? तुमच्या सेवेला हजर करतें तिला—तुम्ही नुसता पैसा मोजा म्हणजे झालं—"

वॉंगनें धडधडत्या छातीनें त्या चित्राकडे पाहिलें. त्यांतली एक स्त्री, अगदीं नाजूक बांध्याची, इवल्या बाहुलीसारखी रेखींव चेहेऱ्याची होती. तिचं नांव 'पंकजा.' वॉंगनें तिच्याकडे बोट दाखविलें. तिकडे पाहात असतां त्याच्या चित्तवृत्ति चंचल झाल्या, बेफाम झाल्या—तिच्या-शिवाय सारें जग त्याला निरर्थक वाटूं लागलें.

दुसऱ्या दिवशीं रात्र पडायच्याहि आधीं वॉंग चहा-घरांत येऊन दाखल झाला. कोकिळाबाईबरोबर तो वरच्या मजल्यावर निघाला. अगदीं चित्रांत असल्यासारखी ती पलंगावर पाय सोडून बसली होती. अगदीं इवलेसे तिचे हात, बारीक सडक बोटें, चिमुकले पाय, लहान फुलासारखा चेहरा, बदामाकृति डोळे पाहून वॉंगला ती स्वर्गांतली परीच वाटली. स्पर्शानेंहि चुरडून चिरडून जाईल असा तिचा नाजूक

बांधा पाहून वॅांग अगदीं जपून दूर दूरच बसला. शेवटीं तिलाच हंसून विचारावें लागलें—

—"आतां नुसतं बघून बघूनच रात्र काढायची का बाई ?"

मग शरमेनें अगदीं चूर होऊन वॅांग तिला म्हणाला—"माफ कर ! मी आपला एक शेतकरीगडी आहे. मला यांतलं कांहीं नीटसं ठाऊक नाहीं. तूंच शिकव मला—"

अन् मग पंकजानें त्याला सारें–सारें शिकविलें !

—७—

वॅांगची स्थिति आतां वेडयासारखी झाली. रात्रंदिवस त्याला पंकजाचा ध्यास लागला. सारी रात्र अधाशीपणें तिच्या सहवासांत, विलासांत घालविली तरी तो अतृप्तच राही. उपभोगाची आग त्याच्या अंगांत पेटली : विलासानें, भोगानें विझण्याऐवजीं ती आणखी पेटे.

आतां पंकजाला आपला तिटकारा वाटूं नये म्हणून तो रोज स्नान करूं लागला. रेशमी कपडे वापरूं लागला. आपली लांब शेंडी त्यानें कापून टाकली. हळू हळू ओ-लान्च्या ध्यानांत हा फरक येऊं लागला. वॅांगची वागणूकहि आतां बदलली. गोड शब्दाऐवजीं कडु, तुटक आणि तिरस्काराचे शब्द तो बोलूं लागला. आतां त्याच्या ध्यानीं, मनीं पंकजा ! रातदिनीं, पंकजा ! आसनीं, शयनीं, भोजनीं पंकजा आणि पंकजा ! !

हळू हळू वॅांगच्या काकाकाकूंनीं वॅांगच्या वाडयांतच आपलें बिऱ्हाडबाजलें आणून टाकलें होतें. आळशी काकाबद्दल वॅांगला तिरस्कारच वाटे. पण त्याची काकू महावस्ताद, बारा गांवचं पाणी प्यालेली, धोरणी बाई होती. तिनेंच प्रथम ओळखलं कीं इथें पाणी मुरत

आहे. वँगचा पाय घराबाहेर पडला आहे हें तिनेंच प्रथम ओ-लान्‌च्या कानावर घातलें. एकदां या गुपिताचा फुगा फुटल्यावर मग वँगचीहि भीड चेपली. त्याच्या काकूची त्याला आणखी फूस. " हो मग ! श्रीमंतांनीं कंगालासारखं सदा एकाच पेल्यानं का पाणी प्यायचं ? पुरुषांची जात ! मर्दानी शौक ! जरा दौलतीला शोभेलसं अंगवस्त्र बाळगलं तर काय बिघडलं त्यांत ? "म्हणून ती वँगचेंच समर्थन करी.

—आणि म्हणूनच वँगनें यापुढील पाऊल टाकण्याचाहि धीर केला. त्याची काकू आणि कोकिळाबाई यांना मध्यस्थी घालून त्यानें पंकजाचा कायम सौदाच ठरविला. तिला घरींच आसरा देण्याचें ठरविलें. थैली मोकळी सुटली. जमिनीनें दिलेलें वैभव एका वेश्येला घरचा आसरा देण्यांत खर्च झालें.

पंकजाबरोबर तिच्या तैनातीला कोकिळाहि वँगच्या घरांत शिरली. ओ-लान्‌नें रडून डोळे मुठीसारखे केले. पण बोलून उपयोग नाहीं हें तिला कळलें. तिनें एक तेवढें केलें.

शेजघरच्या भोगदासीचा अधिकार घरच्या राणीपेक्षां जास्त नाहीं, हें तिनें आपल्या धीरगंभीर वृत्तीनें दाखवून दिलें. तिच्या पावित्र्याचें तेज इतकें होतें कीं वँगच्या कलंकित डोळ्यांना तिच्याशीं डोळा भिडवितां येईना. त्यानें दुसराच मार्ग काढला. एका घरांत दोन चुली झाल्या. घराला नवे सोपे जोडले गेले. नवे चौक आले. त्यांत पुष्करिणी बांधली गेली. पंकजासाठीं साऱ्या स्वतंत्र सुखसोई वँगनें करून दिल्या. सारा दिवसभर रेशमी कपडे घालून, नटून थटून, मेवामिठाई चघळत, कोकिळाबाईशीं गप्पा छाटीत ती या आपल्या विलासमंदिरांत गाद्यागिरद्यांवर पडून असे.

आणि ओ-लान् ?

एवढ्या श्रीमंतीच्या घरांत ती स्वत: मुलांबाळांचा सैंपाक करी, त्यांचे कपडे धुवून देई. अशीच एक दिवशीं कपडे बडवीत ती उदासपणें बसली असतां वाँग तिच्या जवळ येऊन उभा राहिला. त्यानें प्रश्न केला.

" दोन मोती होते तुझ्या जवळ, कुठें आहेत ते ?

—आहेत माझ्याजवळ.

—उगीच ठेवून काय करायचेत ?

—मला नको आहेत ते. छोटी जरा मोठी झाली म्हणजे एरिंग करून घालणार आहे तिच्या कानांत.

—छोटी ? अँऽ—त्या काळुंद्रीला कशाला हवेत मोती ? सुंदर मोती सुंदर चेहऱ्यालाच्च शोभायचे. आण ते इकडे. मला हवेत. "

ओ-लान्नें आपल्या सुरकुतलेल्या हातानें ते चोळींतून काढून वाँगच्या हातावर ठेवले. त्यांच्याकडे बघत, हंसत वाँग निघून गेला.

ओ-लान्चें डोकें खालीं वांकलें. ती धूत असलेल्या कपड्यांवर तिचे अश्रु कितीतरी वेळ सारखे ओघळत होते.

पण पंकजाची प्राप्ति होऊनहि वाँग सुखी नव्हता. त्याचे काका-काकू आणि त्यांचीं पोरें यांनीं वाँगचें सारें घर आपलेंच समजून हवा तसा आडवा हात मारण्याचा सपाटा लावला होता. काकाला हांकून देण्याचा एकदां वाँगनें प्रयत्न केला तर त्यानें आपल्या कोटाआड लपविलेली एक खोटी लाल दाढी वाँगला दाखविली—आणि वाँगची दांतखीळ बसली. लाल दाढी म्हणजे लुटारू टोळीची खूण. साऱ्या देशभर या टोळ्यांनीं दहशत बसविली होती. खून, जाळपोळ हा

यांचा नेहमींचा व्यवसाय. वाँगला कळून चुकलें कीं काकाला जरा डिंवचलें तर आपलीं शंभर वर्षें भरलींच.

या चिंतेंत दुसरी भर म्हणजे वाँगच्या मोठ्या चिरंजीवांनीं अवेळींच आपले गुण उधळण्यास सुरुवात केली. दारू पिऊन झिंगून येणं म्हणजे नेहमींची बाब. चुलतभावाबरोबर एकदां माडी चढून हे पुरुषार्थ गाजवून आले! साऱ्यांवर त्यांनीं कळस केला म्हणजे खुद्द पंकजाशींहि नेत्रपल्लवी करण्याची त्यांनीं सुरुवात केली. वाँग एकदां मुद्दाम अचानक आला असतां आपल्या चिरंजीवाला आपल्याच वल्लभेशीं प्रणयकूजितें करतांना त्यानें पकडलें. यानंतर यथास्थित तिंबलेल्या कणिकेचे मुष्टिमोदक चारून या दिवट्या चिरंजीवांची रवानगी ' शिक्षणासाठीं ' परप्रांतीं करण्यांत आली!

वाँगच्या शेतावर आणि भोंवतालीं प्रचंड टोळधाड येऊन गेली. बऱ्याच काळानंतर, सुखासीन वृत्ति सोडून वाँगनें जातीनें टोळांचा बंदोबस्त करण्यांत पुढाकार घेतला. नुकसान बरेंच झालें, पण पुन्हां वाँग शेतावर आला. कष्टाचा-घाम त्याच्या शेतांत गळला. त्याचें जळतें मन जरा शांत झालें. त्याचे दोन लहान मुलगे मात्र बरे निघाले. एक व्यापारी पेशांत शिरला, दुसरा शेतकी-पेशांत. वाँगला तेवढें तरी समाधान.

एके दिवशीं वाँग अंतर्गृहांतून बाहेर येत असतां त्याची लहान मुलगी आपलें रडें आवरतांना त्याला दिसली. वाँगनें विचारल्यावर ती म्हणाली, " आई माझे पाय घट्ट बांधते अन् मला रडूं येतं. पण मला ती म्हणते, पाय न बांधले तर तुझ्या नवऱ्याला तूं आवडणार नाहींस. तुझ्या वडिलांचं प्रेम जसं माझ्यावरून उडालंय् तसंच त्याचं तुझ्यावरून उडून जाईल. "

हे शब्द ऐकून वाँगला चरका बसला. आपण ओ-लान्‌शीं नीटपणें वागत नाहीं ही जाणीव त्याच्या मनांत सतत सलत होतीच. पण त्यानें स्वतःचें समाधान केलें, ' काय कमी केलंय् मीं तिला ? कधीं मारलंय् तिला ? कधीं तिनं पैसा मागितला अन् मीं दिला नाहीं असं झालंय् ? आतां पंकजासारखं प्रेम नाहीं तिच्यावर, त्याला मीं काय करावं ? तिच्या रूपाचा दोष तो. सारे पुरुष असेच वागतात नाहींतरी. "

—८—

आतां ओ-लान् सारखी खंगत चालली होती. तरी तशीच उठून ती चूल पेटवी, घरकाम करी. वाँगनें तिला विचारलें तर ' पोटांत आग होते,' यापलीकडे ती कांहीं सांगत नसे. वाँगनें वैद्याला बोलाविलें. रोग असाध्य म्हणून त्यानें भलतीच रक्कम मागितली. तशांत ओ-लान्‌नें डोळे उघडले. ती म्हणाली—" नको, माझ्या जीवाची इतकी किंमत नाहीं. एवढयांत कितीतरी जमीन येईल. कांहीं झालं तरी जमीन विकून औषध करूं नका. सुखानं मरूं द्या मला. "

घरांत मुलें लहान. कोकिळाबाई, पंकजाचा वाराहि ओ-लान्‌ला सहन होत नसे. तिने धाकट्या मुलाचें लग्न ठरवून ठेवलें होतें. तें उरकून घेतलें. सूनबाई घरीं आली. त्या बापडीनें आपल्या सासूबाईची शेवटच्या दिवसांत मायेनें शुश्रूषा केली. ओ-लान्‌नें मुलांकडे, सुनेकडे डोळे भरून पाहिलें. वडील, आजोबा यांची नीट काळजी घेण्याचें वचन त्यांच्याकडून घेतलें.

शेवटीं शेवटीं तिची शुद्धि गेली. मधेंच ती बडबड करी—" हो ! आहे मी कुरूप ! पण मुलाबाळांची आई आहे मी म्हटलं ! दासी होतें ती मालकीण झालें. चार हिऱ्यांची आई झालें. बाजारबसवीला असेल पुष्कळ रूप, पण पोट पिकेना कधीं—काय करायचंय अशीला ? मींच

त्यांची काळजी घेतली जन्मभर....खस्ता खाल्ल्या, त्यांना स्वतः करून घातलं नेहमीं जेवणखाण. कोण करणार आतां हें सारं ? कोण घेईल यांची काळजी ?...."

शेवटच्या घटकेला वाँग तिच्या उशाशीं बसून होता. तिचें अंतकाळचें रूप त्याला बघवेना. थिजलेल्या डोळ्यांनीं ती भिरीभिरी पाही. वाँग तिला दिसत नव्हता. शेवटीं तिचें सारें अंग जोरानें शहारलें. तिचें डोकें उशीवरून खालीं घसरलें.

—निष्प्रेम, कष्टमय संसारांतून ओ-लान् सुटली होती !

—९—

काळपुरुष एकदां आला कीं घर पाहून जातो. ओ-लान्च्या मृत्यूनंतर वाँगचे वृद्ध वडीलहि मृत्यु पावले. वाँगनें दोघांची उत्तरक्रिया मोठ्या थाटानें आणि इतमामानें केली. ओ-लान्ला मूठमाती दिल्यावर वाँगचें मन एकाच गोष्टीबद्दल खाऊं लागलें आपण ते दोन मोतीं ओ-लान्कडून काढून घेतले नसते तर बरें झालें असतें असें त्याला राहून राहून वाटे. पंकजानें यानंतर किती हट्ट केला तरी ते मोती त्यानें तिला कानांत घालू दिले नाहींत.

वाँगच्या मालकीच्या जमिनींत ओ-लान् आणि त्याचे वडील यांची थडगीं बांधलीं गेलीं. तीं पाहून शेवटीं त्याला रडें कोसळलें. आतां त्याला म्हणावें लागलें, 'माझं पहिलं अर्ध जीवनच इथं पुरलं आहे आतां. तें जीवनच खरं सुखाचं होतं. आतां घरांत जगतो आहे तें जीवन निराळंच वाटूं लागलंय्. कोण जाणे काय होणार आहे पुढें ?"

वाँगचें वय आतां उतरणीला लागलें. तापलेलें रक्त थंड होऊं लागलें. विषयासक्तीची आग थंडावूं लागली—पंकजाचें वेड कमी

होऊं लागलें—आणि त्यानें पुन्हां जमिनीकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. मोठा पूर आला, पण वॉंगचें उत्पन्न वाढवून, सावकारीची जोड देऊन गेला. त्याच्या काकाच्या उर्मटपणाला आतां त्याच्या चुलतभावाच्या वाह्यातपणाची जोड मिळाली. त्याला कंटाळून वॉंगनें आपलें बिऱ्हाडच बदललें.

ज्या व्हॅंग घराण्याच्या मोठ्या वाडयांत वॉंग पूर्वीं एक गरीब शेतकरी म्हणून एका दासीसाठीं भीतभीत शिरला होता, त्याच वाडयांत त्यानें आपलें बिऱ्हाड नेलें. व्हॅंग सरदार बसत असे त्याच खुर्चीवर तो बसला. वॉंगला आपल्या जीवनाची कृतकृत्यता झाल्यासारखें वाटलें.

वॉंगचा मधला मुलगा हुशार निघाला. वडिलांचा बराच भाग त्यानें हलका केला. वॉंगच्या उतारवयांत त्याला शांति मिळाली. मधून मधून कांहीं खळबळीचे प्रसंग येत आणि जात. पुन्हां जमिनीची मशागत, मळणीचें संथ जीवन ठराविक चाकोरींत सुरू.

वॉंगनें काका--काकूंचा जुलूम कमी करण्यासाठीं त्यांना अफू ओढण्याचें व्यसन स्वखर्चानें लावून दिलें. आपल्या वाह्यांत पुतण्याला पाहिजे होते तितके पैसे देऊन परप्रांतीं शिपाईगिरीची हौस भागविण्यास पाठवून दिलें. त्यानंतर कांहीं काळानें तो बराच फौजफांटा घेऊन, वॉंगच्या घरांत बराच धुमाकूळ माजवून आला तसा निघून गेला.

या वेळीं त्यानें 'अनारकली' नांवाच्या एका मुलीवर हात टाकण्याचा यत्न केला, पण वॉंगनें तिची सुटका केली. पंकजाचें त्याचें वेड आतां ओसरलें होतें. त्याच्या म्हातारपणीं ही अनारकली

२९०६३ वा.श्रा.

मात्र खरोखरची एकनिष्ठ सोबतीण मिळाली. तिनें साऱ्या तरुण माणसांची धास्ती घेतली होती. रात्रंदिवस ती वॉंगला रिझवून, त्याची शुश्रूषा करून त्याच्याजवळ राहून सुखवी. ओ-लान्‌ची मरतेवेळची काळजी पंकजानें नाहीं तरी या अनारकलीनें तरी दूर केली. वॉंगच्या अंगावर नातवंडें खेळूं लागलीं. त्याचा इमानी दिवाणजी चिंग मेल्यावर त्यानें जमीन खंडानें दिली, पण हातभरहि जमीन विकली नाहीं. त्याच्या मुलांना वाटे आपण शहरांत जाऊन चैनींत राहावें. पण वॉंग त्यांना बजावीत असे, 'बाबांनो, जमिनीवरच आपलं वैभव. सारा कुटुंबवृक्ष जमिनींतच बळकट रोवलेला आहे. जमीन सोडा—सारं कुटुंब, सारं वैभव उलथून पडेल.'

वॉंग आतां म्हातारा झाला. ज्या व्हँगच्या वाड्यांत त्यानें ओलान्‌ची भीक मागितली, त्याच वाड्यांत, त्याच खुर्चीवर बसून, आतां आपल्या दासींचीं लग्नं दुसऱ्या गरीब कामकऱ्यांशीं तो लावून देई. जें जें कांहीं करावें अशी त्याची इच्छा होती तें तें त्यानें केलें होतें. आतां त्याची आशाच मेली. शांतपणें मुलाबाळांत बसावें आणि वेळ भरली कीं संसारांतून उठून जावें एवढेंच उरलें.

—१०—

तशा म्हातारपणांतहि वॉंगला एक ध्यास होता—"माझी जमीन—माझी जमीन!" पुन्हां आपल्या पहिल्या खोपटांत जाऊन तो कधीं बसे. ओ-लान्‌बरोबर ज्या खाटेवर तो निजत असे त्या खाटेवर पुन्हां निजे. शेतावर जाऊन, पानें, फुलें, गवत खुडून, हातांत घेऊन तास तास बसे—या जमिनीवर त्याचें जीवन गेलें—या जमिनीच्या कुशींतच तो समाधानानें निजणार होता. त्याच्या शेवटच्या दिवसांत त्याला राग

आला असेल तर तो एकाच दिवशीं. एकदां त्याचीं दोन मुलें आपापसांत कुजबुजत होतीं. “ आधीं हें शेत विकूं—मग तें विकूंया. ” हें बोलणें वाँगनें ऐकलें आणि एकेकांना असें फैलावर घेतलें कीं त्यांनीं मानाच खालीं घातल्या. पण वाँग वारला कीं जमीन विकूं ही त्यांची कल्पना कांहीं नाहींशी झाली नाहीं ती नाहींच.

ज्या खोपटांत ओ-लान्‌बरोबर त्यानें संसार केला त्या खोपटयांतच वाँगनें देह ठेवला. त्याच्या मुलांना व्हँगचा मोठा वाडा सोडून इथें राहण्याचा कंटाळा येई. शांत, प्रेमळ अनारकली मात्र रात्रंदिवस वाँगची शुश्रूषा करी. पंकजा आतां नुसती चरबीची बरणी झाली होती. कोकिळाबाईच्या खांद्यावर हात ठेवून, धांपा टाकीत कधीं कधीं ती इकडे तिकडे फिरे. अनारकलीवर वाँगचें प्रेम बसलेलें पाहिल्यापासून तिनें वाँगशीं अबोला धरला होता. आपल्याच खोलींत ती फुरंगटून एकटी राही.

वाँगचें शरीर जमिनीवर पोसलें होतें. त्या बळकट, राकट शरीरांतून त्याचा प्राण जातां जाईना. तासन्‌ तास ऊर्ध्वश्वास लागून तो पडला. त्याचीं मुलें कंटाळून जाऊन झोंपलीं. अनारकली तेवढी भरल्या डोळ्यांनीं त्याच्या डोक्यावर हात फिरवीत, त्याला धीर देत रात्रभर एकटी बसली होती. तिच्याकडे नजर टाकली कीं वाँगच्या फांकलेल्या डोळ्यांत जरा समाधान चमके. त्या श्वासांत त्यानें घाबरून विचारलें—‘ पोरी ! मरण म्हणतात तें यालाच का ?’

अनारकलीच्या डोळ्यांना धारा लागल्या. वाँगचा हात तिनें घट्ट धरून ठेवला. त्याला ती धीर देऊं लागली—“ असं काय करावं ? आत्तां बरं वाटेल आपल्याला. मरणाची गोष्टच काढूं नये—पुष्कळ बरं आहे आतां—पुष्कळ बरं वाटतंय....’’

ती असें म्हणत असतांनाच वॉंगनें शेवटचा श्वास घेतला. त्याचा प्राण जात असतानां त्याचें सारें शरीर ताठरलें. अनारकलीच्या हातांत असलेला त्याचा हात ताडकन् उसळून, तिच्या तोंडाला लागून—खालीं पडला.

तिनें त्याचे डोळे झांकले. हातपाय सरळ केले. ती स्फुंदत म्हणाली, " जन्मांत कधीं कधीं—आपण कधीं हात उचलला नाहींत माझ्यावर—ही पहिली अन् शेवटचीच वेळ. " तिला आसरा होणाऱ्या वॉंगच्या हातावर तिनें डोकें टेकलें आणि अश्रूंना वाट करून दिली.

तिच्या निरोपावरून वॉंगचे चिरंजीव जांभया देत आले, आणि उत्तरक्रियेची तयारी करूं लागले.

वॉंगच्या वैभवाप्रमाणें मोठ्या थाटानें त्याचें दफन करण्यांत आलें. साऱ्यांनीं दु:खाचा चांगला देखावा केला.

वॉंगचे वडील, काका आणि ओ-लान् यांच्या कबरी असलेल्या जागेंत त्याच्या जमिनींत, ओ-लान्शेजारीं वॉंगची शवपेटिका पुरण्यांत आली. हळू हळू सारे त्याला विसरले. त्याचीं मुलें जमिनीच्या वांटण्याच्या वाटाघाटी करूं लागली.

—प्रेमळ अनारकली मात्र त्याच्या समाधीशीं नेहमीं जाऊन बसे. तिथें अश्रु ढाळी. प्रेमाचे—कृतज्ञतेचे—बोल बोलत तासन् तास बसून राही.

वॉंगचें जीवन असें संपलें. त्याची जमीन मात्र त्याच्या भोंवतालीं पसरली होती. तिनेंच त्याला चिरकालचा आसरा दिला.

३. शाप !

रुडयार्ड किपलिंग्

नर्मदा तीरावरील गर्द जंगलांत, भिल्लांच्या वस्तींत अजून एक मोडका, जमीनदोस्त झालेला मिशनरी लोकांचा बंगला आहे. त्या मोडक्या घरामागें एका फाजील उत्साही मिशनरी दांपत्यांचा उद्बोधक इतिहास दडलेला आहे. तो माहीत असणाऱ्या व्यक्ती फार थोडया. मिशनरी मजकूर दांपत्य, भिल्लांच्या या प्रांताचे ॲसिस्टंट कलेक्टर क्लाडियोसाहेब, भिल्लांचा धर्मगुरु अथान दाजी, भिल्लांची टोळी आणि हें वाचल्यावर तुम्ही. बाकी या प्रकरणांत साऱ्यांनींच मूग गिळले—कदाचित् धडा घेऊन कानाला खडाहि लावला असेल.

रेवरेंड जस्टस क्रेंक आणि त्यांची पिवळ्या केसांची पत्नी 'लोटा' यांना एकदां साक्षात्कार झाला कीं अज्ञानी, मूर्तिपूजक लोकांत जाऊन आकाशांतल्या बापाचें शुभवर्तमान प्रसृत करावें. हजारों मैलांचा समुद्र तुडवून ते इकडे आले, आणि प्रभूच्या कार्याला सुरुवात करण्याआधीं भिल्लांच्या ॲसिस्टंट कलेक्टराची त्यांनीं भेट घेतली.

ज्या लोकांत जाऊन काम करायचें ते लोक, तिथली परिस्थिति, मिशनऱ्यांचें जिणें या कशाचीच या दोघांना माहिती नव्हती. छापील रिपोर्टांत फक्त नांवें आणि आंकडे दिलेले असतात. पण तिथें काम करणारांचे श्रम, अडचणी, निराशा, आयुष्यांचीं वर्षें यांचा हिशेब तिथें सांपडणार नाहीं. मिशनरी बंगल्याभोंवतीं जमणाऱ्या जंगली नागडया उघडया लोकांत ज्ञानाच्या, धर्माच्या आशेनें येणारे किती, पैशाच्या, अन्नाच्या, औषधाच्या आशेनें येणारे किती याचें खरें ज्ञान या मिशनऱ्यांना झालें असतें तर ?

ॲसिस्टंट कलेक्टरनें यांपैकीं कांहीं गोष्टी क्रेंक पतिपत्नीच्या मनावर ठसविण्याचा अयशस्वी यत्न केला. यापूर्वीच्या कितीक मूर्ख मिशनरी लोकांची काळजी घेतां घेतां त्याच्या नाकीं नऊ आले होते. एका स्कॉच मिशनऱ्यानें तर सरळ जाऊन या लोकांच्या देवमूर्तीलाच छत्रीनें बडविण्यास सुरुवात केली, आणि मग त्या लोकांनीं त्यालाच यथास्थित बडवून काढलें. तरी बरें, एवढ्यावरच निभावलें. या पलीकडच्या डोंगरावरच्या लोकांच्या वाटेला तो गेला असता तर त्यांनीं त्याला मारूनच टाकला असता. अशा अनेक गोष्टी सांगून क्लॉडिओनें त्यांना परावृत्त करण्याचा यत्न केला पण त्या मिशनरी लोकांच्या अंगांत आतां संचार झाला होता, ते कुठले ऐकायला ?

रानावनांत, जंगली लोकांत राहणं म्हणजे काय याची त्यांना अजून कुठें कल्पना होती ? तिथें पोस्ट नाहीं, तार नाहीं, आगगाडी नाहीं; स्वतःच्या जातीचें एकहि माणूस दिसायचें नाहीं. अगदीं एकलेपणानें वेड लागण्याची पाळी यायची माणसाला. भुकेनें मरायची पाळी नाहीं येणार, पण अन्न मिळायचें तें असें कीं ते पाहिल्याबरोबर वांच्छाच उडून जाईल शहरांतल्या माणसाची.

अशा किर्र जंगलांतल्या भिल्लकोळी लोकांत, अगदीं तुटपुंज्या पगारावर क्रेंक पतिपत्नी ध्येयवादानें वेडे होऊन येऊन ठेपले होते. दोघेहि तरुण, अजून जगाचा अनुभव नाहीं, टक्केटोणपे खाल्लेले नाहींत, अडचणींची कल्पना नाहीं. कामाला हात घातला कीं यश आलेंच पाहिजे अशी त्याची कल्पना.

या उलट क्लॉडिओ या जंगली लोकांत कितीतरी वर्षे राहून निढोवला होता. जंगली लोकांची नस त्यानें ओळखली होती. ते लोकहि

त्याला मानीत. लाकूडफांटा, दूध, मासळी, जंगलची शिकार ते त्याला आणून देत. क्लॉडिओ त्यांना औषधें देई, त्यांच्याशीं आपलेपणानें वागे. अथान दाजी आणि तो मिळून त्या लोकांचे साधेसुधे प्रश्न सोडवीत. तो शेवटीं म्हणाला, "हें बघा, तुम्ही कांहीं वर्षं या देशांत राहिलांत म्हणजे तुम्हांला वाटायला लागेल माझ्यासारखं कीं--हा धर्म काय नी तो धर्म काय, सारे सारखेच. मग कां उगीच ही सारी यातायात ?" शेवटीं तो म्हणाला, "नाहींच तुम्ही ऐकत, तर जा बापडे. पण एवढं तरी करा. माझ्या, साध्यासुध्या भिल्लांशीं नीटपणें मायेनें वागा अन् धड हातापायांनीं परत या म्हणजे मिळाविलं. यापलीकडे तुमच्या हातून कांहीं होईलसं मला वाटत नाहीं."

त्यांना रस्त्याला लावून क्लॉडिओ आपल्या कामाला गेला. या प्रांतांत तो राजा होता. या मलेरियाच्या भागांत त्याचा कलेक्टर येतो आहे कशाला वारंवार ? कुठें एखादा वाघ मार, कुठें पूल दुरुस्त कर, कुठें जातीजातींतलीं भांडणें तोड अशींच त्याचीं जुजबी आरामशीर कामें असत.

क्रॅक पतिपत्नी भिल्लांच्या एका छोटया खेडयांत जाऊन पोंचलीं. एक छोटी झोपडी बांधून शुभवर्तमानाचा प्रसार करण्यास त्यांनीं सुरुवात केली. नर्मदा नदीच्या भव्य गंभीर कांठावर हें खेडें वसलें होतें. पलीकडे एक टेकडी होती. तिच्यावर ग्रामदेवता डुंगरा देवाचें छोटें देऊळ होतें. एकाक्ष, एकदंत डुंगरा देवाचे सारे भक्त; आणि अथान दाजी हा या देवाचा पुजारी.

कांहीं दिवसनीं क्लॉडियो या दांपत्याची हालहवाल पाहण्यासाठीं घोडयावरून या खेडयांत आला. येतांना त्यानें एक छोटी भिल्ल मुलगी आणली होती ती त्यानें या मिशनऱ्यांच्या हवालीं केली.

तिचें नांव नीला.

जरुरीपेक्षां जास्त मुलें झालीं कीं तीं खुशाल टाकून द्यावीं, मरूं द्यावीं अशी या भिल्लांची साधी वहिवाट असे. अशी एक टाकून दिलेली मुलगी क्लॉडियोनें वांचवून या जोडप्याच्या हवालीं केली होती. जस्टसच्या कळपांत निदान एक कोंकरूं तरी मिळालें.

—पहिल्यानं मूल मग—आई—मग बाप अन् मग सारे लोक' अशा चढत्या भांजणीनें त्यांची आशा धांवत सुटली.

क्लॉडियो परत गेला. लोटा त्या मुलीला कुरवाळीत असतां झाडीं-तून एक भिल्लीण येऊन तिनें तिच्या पायावर लोळण घेतली. दोघींना एकमेकींची भाषा अवगत नव्हती, पण जगभर मातृहृदयाची अशब्द भाषा एकच असते. स्त्रीचें हृदय स्त्रीला कळलें. आईला मुलगी परत मिळाली. आई उपकारानें ओशाळी होऊन लोटाची बंदी गुलाम झाली. मुलीबरोबर आईची भर मिशनरी कळपांत पडली, कारण टाकून दिलेली पुन्हां उचलल्यामुळें जातीनें तिला वाळींत टाकली होती. आतां मिशनच तिचें घर उरलें.

दोन दिवसांनीं तिरकामठा घेतलेला एक उघडा नागडा भिल्ल येऊन आपल्या बायकोला परत ओढून नेऊं लागला. जस्टस त्याच्यावर तुटून पडला. त्याच्या क्रूरपणाबद्दल यथास्थित पूजा बांधून त्यानं त्याला चांगला मार दिला. त्या भिल्लाला वाटलें कीं आतां आपलीं शंभर वर्षें भरलीं. पण या गोऱ्या आदमीनें आपल्याला जीवें मारलें नाहीं यानें आनंदून तोहि या आईमुलीबरोबर कळपांत दाखल झाला.

थोडक्यांत सांगायचें म्हणजे हळू हळू जस्टस मिशनऱ्याच्या कळ-पांत रोज नवी नवी भर पडूं लागली. जस्टस जातीनें खपून जमिनी-

तून नवीं नवीं पिकें काढून दाखवी. लोटा भिल्लांच्या बायकांचीं बाळंतपणें करी. अशा रीतीनें कुरकुरत कां होईना; बरेच भिल्ल या मिशनरी लोकांच्या सल्लयाप्रमाणें वागूं लागले,नवा धर्म स्वीकारूं लागले.

डुंगरा देवाचा पुजारी अथान दाजी हा सारा प्रकार रागानें, हेव्यानें पाहात, जळत होता. वरकरणीं त्यानें रेवेरंड ब्रोवांशीं मैत्रीहि संपादली, कदाचित् आपणहि बाप्तिस्मा घेऊन सद्धर्मात येऊं असें मधाचें बोट त्यांना लावलें. परंतु आपल्या लोकांत स्वतःचें खरें स्वरूप त्यानें प्रकट केलें. साऱ्यांना सपाटून दम भरून त्यानें शाप देऊन ठेवला, " लक्षांत ठेवा, या धर्मबुडव्या लोकावर डुंगरा-देवाचा कोप होणार आहे—

"नागडं उघडं राहण्याची आपली वहिवाट टाकून पायघोळ कपडे पेहरताहेत लेकाचे. पण बघून घ्या. एक दिवस असा येईल कीं हेच लोक डुंगरा देवाच्या कोपानें जळून, रडत, ओरडत, नर्मदेंत बुचकळ्या मारतील. "

मध्यरात्रीं डुंगरा देवाच्या देवळांतून शिंगाचा भयंकर नाद येई. दरी दरी घुमवीत दुमदुमे. देवाचे भक्त जागे होऊन थरथरा कांपत. तिथू-नच हात जोडून म्हणत, "देवा ! आमच्यावर दया कर. तुला सोडून धर्मभ्रष्ट झालेल्यांचा चांगला समाचार घे—अन् त्यांचीं सारीं पिकं आम्हांला दे."

असे दिवस चालले होते. हिंवाळ्यांत कलेक्टर आणि त्याची पत्नी या भिल्ल-कोळी लोकांच्या प्रांतांत फिरतीसाठीं येऊन पोंचले. क्लॉडिओ त्यांना म्हणाला, " आलांच आहांत तर जरा पुढें जाऊन क्रेंकच्या मिशनला भेट देऊन या. बांबूचं एक छोटं चर्च बांधलंय् त्यानं त्याचा

उद्घाटन समारंभ तुमच्या हातानं झाला तर त्याला मूठभर मांस चढेल. बरेच सुधारलेले भिल्लकोळी दिसतील तुम्हांला."

ही बातमी मिशनमध्यें पोंचल्यावर तिथें कोण धांदल! क्रेकला खूप अवसान चढलें. तो लोटाला म्हणाला,

"आतां दयाळू कलेक्टर यांचें आगमन होईल. आपण प्रभूच्या कळपांतील सद्धर्माचे अनुयायी त्यांना दाखवूं या. त्यांनीं हातांनीं विणलेल्या कपड्यांनीं आच्छादलेल्या देहानिशीं कलेक्टरांचें स्वागत करावें. मोठा आनंदाचा दिवस येत आहे. प्रभु स्तुत असो!"

—"आमेन–आमेन" लोटा उत्तरली.

बेसल मिशननें आपल्या धर्मांतरित लोकांना कापड विणण्याची कला शिकविली, याचा जस्टसला हेवा वाटे. त्याच्या मिशनभोंवतीं कापूस नव्हता, अन् त्याच्या भिल्लकोळयांच्या अंगांत तितकी कलाहि नव्हती, म्हणूनच बरेच दिवस तो स्वस्थ होता. परंतु त्याचा नवा मित्र अथान दाजी यानें एक वनस्पति जस्टसला दाखविली. तिच्या फांद्या तोडल्या कीं त्यांतून चमकदार, चिवट तंतू निघत रेशमासारखें मऊ कापड त्यांतून विणून तयार करतां येई. मग काय? जस्टसच्या साऱ्या कळपानें खपून खूप कापड तयार केलें—खूप कपडे शिवून ठेवले. कलेक्टरसाहेबांच्या आगमनप्रसंगीं साऱ्यांनीं नवे नवे कपडे पेहरून त्यांचें स्वागत करायचें असा बेत ठरला. जस्टसचे हात आतां आभाळाला लागायचेच बाकी उरले!

कलेक्टरांच्या आगमनाचा दिवस उगवला. नेहमीं उघडे राहणारे भिल्ल कोळी बाटगे आतां नवे केलेले कपडे पेहरून, रस्त्याच्या दोन्ही कडांना रांगा करून उभे केले होते. जस्टस त्यांच्याकडे डोळे भरून

पाहात आपल्या पत्नीला म्हणाला, " प्रिय लोटे ! आतां कलेक्टरांचें आगमन होईल. प्रभूच्या देवळाचें उद्घाटन होईल. आपण आशा करूंया कीं न विश्वास ठेवणारा गॅलिओ देखील प्रभूच्या महिम्यावर विश्वास ठेवूं लागेल. पण प्रिय लोटे ! या प्रभूच्या कोंकरांना जरा नीट स्वस्थ उभे राहण्यास विनंति कर, कांकीं ते सारखे आळोखे पिळोखे देत आहेत—कलेक्टरांना हें पाहून बहुत दुःख होईल— "

एवढ्यांत कलेक्टर, कलेक्टरपत्नी, त्यांचा लवाजमा हे सर्व एक टेकाड चढून मिशनच्या प्रवेशद्वाराशीं आले. सर्वत्र एकदां नजर फिरवून कलेक्टर उद्‌गारले "वा ! छान ! चांगली प्रगति केली तुम्ही इतक्यांत—इतक्या द्रुतवेगानें ही प्रगति झाली तरी .... "

पण प्रभूच्या कोंकरांच्या कळपानें अगदीं निराळ्या दिशेनें आणि निराळ्या अर्थानें द्रुत प्रगति करण्यास सुरुवात केली होती. प्रथम नवे कपडे पेहरलेले ते भिल्लकोळी जागच्या जागींच वेडींवांकडीं तोंडें करीत चुळबुळ करीत उभे होते. हळू हळू ते जागच्या जागीं उड्या मारूं लागले आणि शेवटीं सारी भीड झुगारून, ओरडत आरडत बेफाम घोडयांच्या कळपाप्रमाणें दोखुरांनीं उडया मारीत उधळले.

याच वेळीं डुंगरा-देवाच्या देवळांतलें शिंग भयंकर आवाजांत कर्कशपणें वाजूं लागलें. सगळीकडे हलकल्लोळ उठला—शाप—शाप—डुंगरा देवाचा शाप आहे हा ! एक आवाज आला, " बापरे, आग—आग लागली सर्वांगाला—मेलों ठार ! आई नर्मदे, तूं तरी वांचीव ! "

आणि सारे लोक वेडयासारखे आरडत, ओरडत, सारे कपडे फेकून देऊन, उघडेबंब होऊन नर्मदेंत बुचकळ्या मारूं लागले.

‘ धाक् धाक्—’ डुंगरादेवाच्या देवळांतला ढोल वाजे. ‘भूं-भूं-भूं—’ करून भयंकर कर्णा वाजे. साऱ्यांच्या अंगावर कांटा उभा राहिला.

रेवरेंड जस्टसबोवा अगदीं रडकुंडीला आले. “ काल—कालच या साऱ्या लोकांनीं दहा ईशाज्ञा अभ्यासिल्या—आणि आज हे सारे असें कां करीत आहेत हें मजला समजत नाहीं....अरे ! अरे ! ! प्रभू स्तुत होवो, जमिनीवरचे, समुद्रावरचे देवदूत प्रभूची स्तुति करोत.... नीला—नीला—तूंच का ही ? ”

जस्टस वेडयासारखा बरळत होता, त्याला कारणहि तसेंच होतें. साऱ्या मिशनचें भूषण म्हणजे चिमखडी नीला. ती तरी आतांपर्यंत धीर धरून जागेवर उभी राहिली होती. पण आतां तिनेंहि आपला परकर ओढून फेकून दिला. एखाद्या रानमांजरासारखी फिस्कारत, किंचाळत, उघडी होऊन ती धांवत सुटली. जस्टसला तडातड शिव्या देत ती पुढें पळे. “ मेल्या, माकडा, मला सांगितलंस कीं नरकांतल्या जाळापासून नव्या धर्मानें कायमची सुटका होईल. अन् आतां या जन्मींच मी जळतें आहे कीं रे ! देवा, डुंगरा—देवा, सोडीव रे या यातनांतून—दया कर, आतां नाहीं तुला सोडणार ” असें म्हणत तिनें नर्मदेंत बुडी मारली.

आतां डुंगरा-देवाच्या शिंगाचा जयघोष दुमदुमत होता. सारे कळपांतले लोक शांत होऊन नर्मदेच्या संथ, शांत, शीतल पाण्यांत पोहत होते.

जस्टस निराशेनें म्हणत होता, “ हें कृत्य सैतानाचेंच असलें पाहिजे. कांकीं ही मुलगी कालच चांगली दुसऱ्यांना मूळाक्षरें शिकवीत होती आणि आज....”

परंतु क्लॉडिओ जवळच जमिनीवर पडलेल्या नीलाच्या परकराकडे निरखून पाहात होता. त्यानें तो हलक्या हातानें उचलला. शर्टची बाही वर करून तें कापड आपल्या मनगटाला लावलें मात्र—आणि त्याच्या त्वचेवर एक लालभडक चट्टाच उठला !

तो म्हणाला, " हं, मला वाटलंच. "

जस्टसनें विचारलें, " काय म्हणतां तुम्ही ? "

क्लॉडिओ म्हणाला, " हें कापड विणायला धागे मिळाले तरी कुठून तुम्हांला ? "

जस्टस उत्तरला—" त्या अथान दार्जीनंच दाखवून दिलीं हीं झुडपं आम्हांला. त्यानंच शिकविलं इथल्या पोरांना या धाग्याचं कापड कसं विणायचं तें. "

क्लॉडियोला हंसूं आवरेना. तो म्हणाला, " मला वाटलंच ! काय पाजी आहे म्हातारा ! अहो, तुम्हांला कसलं झुडूप दाखविलं त्यानं माहीत आहे ? "

" निलगिरी-नेटल म्हणतात याला. विंचवासारखी आग ओकणारी वनस्पति आहे ही. अहो, सहा सहा आठवडे भिजत टाकावी तरी आग करते हातांची. विणून दोर करतात त्याचे. बाकी हुशारी खरी त्या गुलामाची. या भिल्लांच्या राकट त्वचेवर परिणाम व्हायला म्हणून अर्धा तास घेतला या वनस्पतीनं—अन् मग एकदां त्याचा प्रभाव सुरू झाला अन्—"

गॉलिओ पोट धरधरून हसूं लागला. पिवळ्या केसांची लोटा कलेक्टरपत्नीच्या खांद्यावर डोकें टेकून मुसमुसूं लागली. रेवेरेंड जस्टस बोवांनीं लाजेनें आपलें तोंड झाकून घेतलें.

गॅलिओची बडबड चालली होतीच. " विंचवाचें झाड, खाय-कुजली ! जस्टसबोवा ? अहो, आधीं मला तर विचारायचं होतं ? या नागड्या उघड्या भिल्लकोळ्यांखेरीज साऱ्यांना ठाऊक आहे हिचा प्रताप !

अन् बघा. मला या लोकांची रीत नीट ठाऊक आहे. अगदीं लिहून ठेवा माझं भविष्य. आतां पुन्हां ते तुमच्याकडे बिलकुल फिर-कायचे नाहींत. "

त्यानें पलीकडे नजर टाकली. जस्टसचे एकवेळचे अनुयायी अजून त्याला शिव्याशाप देत नर्मदेच्या प्रवाहांत बुचकळ्या मारीत होते. हा प्रकार पाहून त्याचें हंसूं विरलें. त्याला कळून चुकलें कीं आतां क्रेंक दांपत्यांच्या मिशनचीं इथलीं शंभर वर्षें भरलीं.

आणि झालें तें असेंच. जस्टस, लोटा हे त्यांतल्यात्यांत आशा उराशीं बाळगून कांहीं दिवस त्या खेड्यांत रेंगाळत राहिले. कांहीं पूर्वाश्रमीचे नव-ख्रिस्ती मिशनभोंवतालच्या झाडींत, शाळेजवळ पुन्हां पुन्हां भटकत. पण उजळपणें मिशनऱ्यांच्या समोर येऊन बसा-यची एकाचीहि तयारी नव्हती. साऱ्यांची ठाम समजूत अशी कीं ख्रिस्ती झालें कीं डुंगरा-देवाचा शाप बाधतो, नखशिखान्त अंगाचा दाह होऊं लागतो. एकदां अनुभव आलाच. पुन्हां या विषाची परीक्षा पाहायला कोण तयार होणार ? आतां रेवरेंडबोवा आणि त्याची बाई यांनीं आपलें चंबूगवाळें आटपावें हें ठीक. त्यांची भिल्लकोळ्यांना गरज नाहीं असें या दांपत्याला सुचविलें गेलेंच.

क्लॉडिओनें गुप्तपणें अथान दाजीला खडखडीत खलिता पाठविला होता कीं या दोघांच्या केसांलाहि धक्का लागला तर याद राखून

ठेवा. अथान दाजीच काय, त्याच्या साऱ्या सोबत्यांना डुंगरा–देवाच्या देवळासमोर फांसावर लटकावें लागेल, असा दम मिळाला म्हणून हे भिल्लकोळी स्वस्थ बसले, नाहींतर त्यांच्या विषारी बाणांनीं क्रेंक बोवांना त्यांनीं केव्हांच आकाशांतल्या बापाकडे पाठवून दिलें असतें !

अशी गय केली तरी एक गोष्ट मात्र त्या लोकांनीं करायची ती केलीच. त्या दिवसापासून मिशनला मासोळी, कोंबडी, मांस, दाणा, कांहींएक मिळेना. अन्नाशिवाय नुसत्या ईश्वरभक्तीच्या हवेवर किती दिवस मनुष्य जगणार ?

शेवटीं जस्टसबोवा उदासपणें म्हणाले, "प्रिय लोटे ! आपण इथून निर्गमन करूंया, कांकीं दुसऱ्या कोणाला या कार्याचें यश मिळावें अशी प्रभूची इच्छा दिसते. आतां आपण जाऊंया. म्यां आतां थोडा वनस्पतिशास्त्राचा अभ्यास करावा हें ठीक."

—" आमेन ! " लोटा उद्गारली.

अजून कोणाला या भिल्लकोळ्यांत शुभवर्तमानाचा प्रसार करण्यासाठीं जाण्याची इच्छा असेल तर त्यांच्यासाठीं मोडकातोडका मिशनचा बंगला ओसाड पडलेला आहे. मात्र मिशनची शाळा आणि तें बांबूचें देऊळ यांवर नर्मदातीराचें गर्द, घनदाट जंगल पसरलेलें दिसेल !

४. देवी आणि डोंबारी

आनातोल फ्रान्स

फार वर्षांपूर्वी, लुई राजाच्या काळांत, फ्रान्समध्यें, ‘ कोंपन्यि ’ गांवीं बार्नबी नांवाचा एक डोंबारी राहात असे. गांवोगांव भटकून शक्तीचे प्रयोग करावे, अंगचलाखीचे खेळ करावे असा त्याचा क्रम असे.

हवा चांगली असली म्हणजे तो एखाद्या गांवांतल्या मुख्य चौकांत आपला लहानसा गालीचा पसरून त्याच्यावर उभा राही. जुन्या पिढींतल्या एका म्हाताऱ्या डोंबाऱ्याकडून त्यानें एक भाषण शिकून घेतलें होतें. प्रत्येक वेळीं एका अक्षराचाहि बदल न करतां तो पाठ म्हणत असे. तो मोठमोठ्यानें भाषण करूं लागला म्हणजे हळू हळू त्याच्याभोंवतीं घोळका जमे. त्यांत बराचसा भरणा पोरासोरांचा आणि निरुद्योगी लोकांचाच असे.

बरीच गर्दी जमली म्हणजे तो आपले खेळ करण्यास सुरुवात करी. निरनिराळ्या प्रकारांनीं अंग वाकवून तो अंगचापल्य दाखवी. कमान टाकून नाकाच्या टोंकावर बशी तोलणें वगैरे साध्या खेळांकडे कोणी फारसें लक्ष देत नसे. पण एकदां खूप गर्दी जमली म्हणजे बार्नबी चांगला रंगांत येई. मग एकदम एक उशी घेऊन तो आपलें सारें अंग हातावर तोलून धरी. तशांतच एका हातानें तांब्याचे चकचकीत चेंडू वर उडवून ते तळपायानें अलगद झेली. मागें कमान टाकून, पाय आणि डोकें यांचें एक चक्रच तो तयार करी. तशाच स्थितींत आठ–दहा सुऱ्या वर उडवून, त्या एकामागून एक अशा झेलीत जाई. असे कौशल्याचे खेळ सुरू झाले म्हणजे मात्र साऱ्या प्रेक्षकांचे डोळे त्याच्यावर

खिळून रहात. साऱ्यांच्या तोंडून " वाहवा ! वाहवा ! " असे उद्गार निघत आणि त्याच्या छोट्या गालीच्यावर पैशांचा सडा पडे.

कधीं कधीं त्याला याप्रमाणें बराच पैसा मिळे खरा, परन्तु सामान्य-पणें म्हणायचें तर वर्षाकांठीं जमा आणि खर्च यांचा मेळ बसवि-तांना त्याची फार ओढाताणच होई. इतरांच्या वांट्याला आलेल्या हालअपेष्टांच्या प्रमाणांत या बिचाऱ्याला कष्टाचा बराच मोठा वांटा उचलावा लागे. सक्त मेहनत तर नेहमींचीच. ती कधीं चुकायची नाहीं. वरें, ती मेहनत करायचीहि त्याची तयारी असे. पण त्यांचा धंदा असा पडला कीं, तो बारमाही चालणारा नव्हता. झाडांना फुलें यावींत, फळें यावींत अशी नुसती इच्छा असून काय उपयोग? त्यासाठीं त्यांना ऊब हवी, सूर्यप्रकाश हवा. बानेबीच्या धंद्यालाहि या गोष्टी अवश्य होत्या.

भर हिंवाळ्यांत, बर्फ, वारा, पाऊस यांच्या सोसाटयांत तो आपले खेळ करणार तरी केव्हां, आणि कुठें? एखाद्या वठलेल्या झाडासारखी त्याची अशा वेळीं स्थिति होई. ' मुंगी आणि टोळ ' यांच्या गोष्टींत हिंवाळ्यांत त्या टोळाची जी स्थिति झालेली दाखविली आहे तीच स्थिति या गरीब डोंबाऱ्याची होई. थंडी-वारा, उपासमारी यांनीं तो अगदीं जर्जर होऊन जाई. पण तो होता आपला सरळ, भोळ्या स्वभावाचा म्हणून सारा त्रास मुकाटयानें सहन करी.

खरें म्हटलें तर पैशांबद्दल त्यानें फारसा कधीं विचारच केला नव्हता. इतर लोक सुखी कां, अन् आपण तेवढे हालांत कां, याचाहि त्यानें विचार केला नव्हता. त्याचा आपला विश्वास होता कीं, या जन्मांत आपल्या कपाळीं हालअपेष्टा आल्या तर पुढच्या जन्मीं तरी

त्याचा वचपा निघेल; चांगलें सुख मिळेल. या आशेवरच तो जीव धरून होता. या जन्मांत हवें तसें वागून चैन भोगून घ्यावी, मग पुढें नरकांत गेलों तरी हरकत नाहीं, असे विचार असणाऱ्या चंगी-भंगी लोकांसारखा हा मनुष्य नव्हता हें खास. त्यानें कधीं देवाधर्मा-विरुद्ध आचरण केलं नाहीं. त्याला बायको नव्हती, तरीहि त्यानें कधीं परस्त्रीकडे वर डोळा करून पाहिलं नाहीं. अनीतीकडे त्याचा जात्या ओढाच नव्हता. त्याचा एकच विरंगुळा म्हणजे एखादे वेळीं फार उकडायला लागलं म्हणजे एखादा ग्लास घ्यायचा एवढाच.

बार्नबी स्वभावानें फार भाविक होता. ख्रिस्तमाता मेरी ही त्याची कुलदेवता. केव्हांहि तो देवळांत गेला म्हणजे प्रथम मेरीच्या मूर्तीपुढें गुडघे टेकून नमस्कार करी आणि मोठ्या भक्तिभावानें प्रार्थना करी—

"जगदंबे ! मी जीवंत आहे तिथवर माझ्यावर कृपादृष्टि असूं दे. आणि मेल्यावर स्वर्गांत सुखांत राहीन असा आशीर्वाद दे."

अशा रीतीनें बार्नबीचा जीवनक्रम चालला होता. अशांत पाव-साळ्याच्या एका दिवशीं तो उदासवाणा होऊन एका खेडेगांवाच्या रस्त्यानें चालला होता. दिवसभर पावसाची रिपरिप चालली होती. त्यामुळें सारे रस्ते, चवाठे चिंब भिजले होते. या स्थितींत बिचारा बार्नबी खेळ करणार तरी कुठें, अन् त्यानें खेळ सुरू केला, तर तो पहाणार तरी कोण ? म्हणून निराश होऊन, आपलीं हत्यारें जुन्या गालिच्याच्या एका तुकड्यांत गुंडाळून, तो तुकडा खांकोटीस मारून बार्नबी रस्त्यावरून चालला होता. एखाद्या वाटेवरच्या घराच्या तबेल्यांत कोरड्या जागीं रात्रीं अंग टाकायला मिळालें म्हणजे पुरे. पोटाला मिळालें नाहीं तरी चालेल, असा विचार त्याच्या मनांत घोळत होता.

तो रस्त्यानें चालला असतां त्याला एक बैरागी भेटला. बार्नबीचा हिरवा पोषाख पाहून तो म्हणाला, " काय रे ? हा हिरवा पोषाख करून कुठें चालला आहेस तूं ? एखाद्या नाटकांतल्या पात्रासारखा सजला आहेस अगदीं ! "

बार्नबी म्हणाला, " कसलं नाटक नि काय ? मी आहें आपला एक डोंबारी. पोटाला ओला कोरडा तुकडा वर्षभर जर मिळत गेला, तर या धंद्यासारखा धंदा नाहीं जगांत, पण तीच तर पंचाईत आहे ! "

तो संन्यासी म्हणाला, " जरा विचार करून बोल. कुठें बैरागी, कुठें डोंबारी. अरे, जगांत जर कोणता व्यवसाय उत्तम आणि पवित्र असेल, तर तो संन्याशाचा जीवनक्रम. बाबारे ! आमचं सारं जीवन म्हणजे प्रभूचं एक स्तुतिस्तोत्रच म्हणेनास ? जगदंबा मेरी आणि संत यांच्या पूजेंत सदा मग्न असतों आम्हीं. अन् तूं म्हणतोस डोंबाऱ्याचं जीवन चांगलं ! हंऽ "

हें ऐकून बार्नबी अगदीं ओशाळला. तो म्हणाला, " बुवासाहेब, मीं अगदीं चुकलों खरा. बोलून चालून अडाणी डोंबारी मी. आम्ही करून करून काय करणार, तर नाकाच्या शेंड्यावर एक काटकी आणि काटकीच्या टोंकावर एक नाणं तोलून असे खेळ करून दाखविणार. तुमच्यासारखं पुण्य आम्हांला थोडंच मिळणार आहे यानं ? गुरुजी ! मला फार फार वाटतं कीं, आपणहि या संसाराचा त्याग करावा, एखाद्या मठांत जाऊन बसावं आणि ईशभजनांत काळ घालवावा. आतां बघा, माझ्या कसबामुळें या पांचशें मैलांत माझं नांव झालं आहे, मग असं तुमच्यासारखं जीवन जगायला मिळालं तर त्याच्यावरहि पाणी सोडायची तयारी आहे आपली."

बार्नबीचा भोळा भाव पाहून त्या संन्याशाच्या मनावर फार परिणाम झाला. त्यानें ओळखलें कीं, हा मनुष्य अशिक्षित असला तरी शास्त्रांत जीं मुक्तांचीं लक्षणं सांगितलीं आहेत तीं या मनुष्याच्या अंगीं बीज-रूपानें आहेत.

तो बार्नबीला म्हणाला, " हें बघ, जवळच्या एका मठाचा मी महंत आहे. तुझी खरीखरी इच्छा असली तर तुला सामील करून घेईन मी त्यांत. तुला मुक्तीचा मार्ग दाखवावा यासाठींच परमेश्वरानें माझी तुझी भेट घडवून आणली असेल. कोणी सांगावं ? "

—अशा रीतीनें बार्नबी डोंबाऱ्याचा बैरागी झाला. मठांत जगदंबा मेरीची पूजा–अर्चा विशेष चालत असे. मठांतला प्रत्येक बैरागी आपल्या अंगीं असेल नसेल तें सारें कौशल्य खर्चून तिच्या पूजेसाठीं कांहीं सेवा करीत असे. बार्नबीला भेटलेला महंत मोठा जाडा विद्वान् होता. जगन्माता मेरीचीं अनेक गुण गाणारीं स्तोत्रें तो लिहीत असे. मॉरिस नांवाचा दुसरा बैरागी हें सर्व लिखाण सुंदर हस्ताक्षरांत लिहून काढी. अलेक्झांडर नांवाचा बैरागी या पोथ्यांच्या समासांत सुंदर वेल-पत्ती, छोटीं छोटीं रंगींत चित्रें काढून त्याची शोभा वाढवी.

पोथीच्या एका पानावर त्यानें एक सुंदर चित्र काढलें होतें. त्यांत ख्रिस्तमाता मेरी एका सिंहासनावर बसलेली दाखविली होती. तिच्या मस्तकाभोंवतीं लखलखीत तेजाकिरणांची प्रभा तळपत होती. वर आकाशांत सात पारवे घिरटया घालीत होते. हे सात पारवे म्हणजे सात दैवी गुण. तिच्या पायांशीं चार भव्य सिंह पहारा करीत होते. तिच्या-भोंवतीं सुंदर सोनेरी केंसांच्या सहा कुमारी उभ्या होत्या. नम्रता, सावधानता, एकांत, विनीत भावना, पावित्र्य आणि आज्ञाधारकपणा

या सहा गुणांच्या त्या मूर्ति होत्या. सिंहासनाच्या पायथ्याशीं दोन गोर उघडीं अर्भकें तिची कृपायाचना करतांना रेखाटलीं होती. हीं अर्भकें म्हणजे तिची दया भाकणारे आत्मे. अशा रीतीनें तत्त्वज्ञानपर गूढार्थ असलेलीं अनेक चित्रें त्या पोथ्यांतून रेखाटलेलीं असत.

मारबो नांवाचा दुसरा एक बैरागी देखील मेरीचा मोठा भक्त होता. सारा दिवस तो मेरीच्या सुबक दगडी मूर्ति घडवीत असे. दगडाच्या बारीक कणांनीं त्याच्या भुंवया, दाढी, केस हे सारे भाग पांढुरके दिसत. त्याचे डोळे लाल होते. त्यांतून पाण्याच्या धारा लागत. वयानें बराच असूनहि त्याचा जोम आणि उत्साह अजून ताजा होता. खरोखर या भक्तावर देवी मेरीची कृपादृष्टि असल्यासारखें दिसत होतें.

त्यानें घडविलेल्या मूर्तींचें स्वरूप असें होतें. मेरी सिंहासनस्थ असून तिच्या डोक्याभोंवतीं मौक्तिकखचित अशी तेजस्वी, गोल किरणप्रभा दिसत होती. पवित्र, शालीन, शुद्ध असें त्या मूर्तीचें ध्यान होतें. कधीं एखाद्या मूर्तींत तो देवीला कुमारी स्वरूपांत घडवून तिचें चिमुकलें बालभावाचें रूप दाखवी.

याशिवाय मठांत अनेक कवीहि होते. मेरीचीं स्तुतिस्तोत्रें ते लॅटिन भाषेंत गद्यपद्यात्मक रचनांतून लिहीत. देशी भाषेंतून देवीचे चमत्कार वर्णन करणारीं स्तोत्रें लिहिणारा एक कवीहि या लोकांत होता.

अशा रीतीनें सर्व मठांत प्रत्येकजण आपापल्या परीनें देवी मेरीच्या आराधनेंत मग्न असे. बिचारा बार्नबी तेवढा या भक्तिगंगेंत कोरडा राहिला होता. स्वतःच्या अज्ञानाबद्दल तो आपल्यालाच दोष लावी. कपाळाला हात लावून स्वस्थ बसे. मठाच्या मागें एक छोटा बाग होता.

बार्नबी एकटाच उदास होऊन या बागेंत फिरत असे. एकदां तो तळतळून म्हणाला,—" देवी ! भगवती ! मी आपला एक अज्ञानी, साधासुधा रांगडा भक्त आहे तुझा. माझ्या अंगीं अशी कोणतीहि कला नाहीं कीं, जिच्या योगानें मी तुझी सेवा करूं शकेन. मला उपदेशपर प्रवचनं करतां येत नाहींत, कीं शास्त्रोक्त प्रकाराचे ग्रंथ लिहितां येत नाहींत. तुझं सत्य स्वरूप डोळ्यांपुढें आणणाऱ्या मूर्ति घडवितां येत नाहींत, किंवा तालबद्ध कविता लिहितां येत नाहींत. माझ्या अंगीं तुझ्या सेवेला वहाण्यासाठीं कोणतीहि कला नाहीं. " अशा रीतीनें सदा न् कदा तो दुःखांत मग्न असे.

एके दिवशीं फुरसदीच्या वेळीं हे सर्व बैरागी गप्पा मारीत बसले असतां, बार्नबीनें एक गोष्ट ऐकली. एका गरीब, अज्ञानी भक्ताला " नमो देवी " या स्तोत्राशिवाय दुसरें कांहींहि येत नसे. सारे लोक त्याच्या अज्ञानाला हंसत. पण तो मेल्यानन्तर त्याच्या तोंडांतून त्या मंत्राइतकींच गुलाबाचीं सुंदर फुलें बाहेर आलीं. अशा रीतीनें त्याच्या भक्तीची प्रचीति सर्वांना पटली.

ही गोष्ट ऐकत असतां देवी मेरीच्या दयालुत्वाबद्दल बार्नबीला राहून राहून आश्चर्य वाटे. त्या भक्ताला जें भाग्याचें मरण आलें त्यानेंहि त्याला समाधान वाटेना. त्याच्या हृदयांतून भक्तिभाव ओसंडून जात होता. देवीची भक्ति कशी आणि कशा प्रकारानें करूं, कशा सेवेनें तिचा माहिमा वाढवूं हेंच त्याला कोडें पडलें होतें. त्या भोळ्याभाबड्या जीवाला प्रयत्न करूनहि कांहीं रस्ता दिसेना. यामुळें तो अधिकाधिक उदास होऊं लागला.

एके दिवशीं पहांटेस मात्र उठल्याबरोबर त्याच्या मनांत एकदम

अनुक्रमांक २८८७८
विभाग गा.का.
१९३४
३-७-५७

कांहीं प्रकाश पडला आणि त्याला आनंदाचें भरतें लोटलें. तो घाई-घाईनें देवळांत गेला, आणि तासभर तिथेंच बसला. संध्याकाळींहि पुन्हां तो देवळांत जाऊन बसला.

यानंतर त्याचा रोजचा क्रम म्हणजे देवळांत जेव्हां कोणी नसेल तेव्हां तिथें जावें. दुसरे भक्तजन आपापल्या परीनें कलाकुसरींनीं देवीची सेवा करीत तेव्हां तो मात्र देवळांत दारें लावून एकान्तांत बसे. आतां त्याची खिन्नता चट सारी नाहींशी झाली. आतां तो उसासे टाकीना; मान खालीं घालीना.

हळूहळू इतर भक्तगणांत बार्नबीच्या या चमत्कारिक वागण्याची चर्चा होऊं लागली. जो तो दुसऱ्याला विचारूं लागला. " हा बार्नबी एकीकडे एकटा देवळांत बसून करतो तरी काय ? " हळूहळू ही बातमी मठाच्या महंतापर्यंत जाऊन पोंचली. मठांतल्या प्रत्येक बैराग्याच्या आचरणावर लक्ष ठेवण्याचें त्याचें कर्तव्य तो कसोशीनें पार पाडीत असे. बार्नबी एकटा देवळांत दार लावून बसला असतां काय करतो यावर आडून पहारा ठेवण्याचें त्यानें ठरविलें.

एके दिवशीं नेहमींप्रमाणें बार्नबी देवळांत गेला. त्यानें दार लावून घेतलें. ताबडतोब एक दोन बैरागी बरोबर घेऊन महंत देवळाच्या दाराजवळ गेला आणि आंत काय चाललें आहे हें फटींतून पाहूं लागला.

देवीच्या मूर्तीसमोर बार्नबी खालीं डोकें वर पाय करून उभा होता. दोन्ही हात मोकळे सोडून तांब्याचे चेंडू आणि सुऱ्या वर उडवून, एकामागून एक भराभर झेलीत होता. स्वतःची डोंबाऱ्याची कला आतां देवीपुढें तो सादर करीत होता. या साध्याभोळ्या कलावंताचा

शुद्ध हेतु लक्षांत न आल्यानें बाहेर उभे असलेले महंत आणि बैरागी खूप रागावले. त्यांना वाटलें कीं हा सारा भ्रष्टाकार झाला !

तसें म्हटलें तर महंताला बार्नबीचा भाविकपणा ठाऊक होता. त्याला एवढेंच वाटलें कीं, या बिचाऱ्या साध्या जीवाला वेड लागलें खास. आतां आंत शिरावें आणि या मनुष्याचा हात धरून बाहेर काढावें असा त्यांनीं निश्चय केला. त्याप्रमाणें ते आंत शिरणार तों ते एकदम थबकलेच. कारण........

ते बघत असतां, पाहतां पाहतां सिंहासनावरची देवी मेरीची मूर्ति पायऱ्या उतरून हळू हळू खालीं आली.

बार्नबी आतां अगदीं रंगांत आला होता. त्याच्या कपाळावरून घाम ओघळत होता. देवी मेरीनें आपल्या बहुमोल सुंदर निळ्या महावस्त्रानें त्याचे घामाचे थेंब पुसून काढले.

हा चमत्कार पाहून महंतानें चकित होऊन गुडघे टेकले. ख्रिस्ताच्या वचनाचा त्यानें उच्चार केला—

—" भोळ्या साध्या भावाचे लोक धन्य होत; कारण त्यांना परमेश्वरदर्शन होणार आहे. "

त्याच्या बरोबरच्या संन्याशांनीं " तथास्तु " म्हणून आदरानें जमिनीवर डोकें टेकलें.

५ : ओसाडगांवचे इनामदार

रवींद्रनाथ टागोर

अर्थात्

नैनजोरचे बाबूजी

एक काळ असा होता कीं नैनजोरचे बाबू बडे जमीनदार गणले जात. अगदीं डाक्क्याची मऊ मलमल असली तरी तिचे कांठ अंगाला रुपतात म्हणून ते फाडून काढीत. इतका उधळेपणा त्यांच्या अंगीं होता कीं हौस म्हणून एखाद्या मांजर-मांजरीचें लग्न लावण्यांत ते हजारों रुपये खर्च करीत. असें म्हणतात कीं एकदां त्यांनीं हजारों दिवे लावून, आणि त्या लखलखाटांत किरणासारख्या दिसणाऱ्या जरतारी सोडून रात्रीचा दिवस केला. पण या साऱ्या गोष्टी फार पूर्वींच्या. श्रीमंती इतमामांत राहणाऱ्या या बाबूंचें ऐश्वर्य शेवटीं ओसरलें. दहा वाती लावलेल्या समईतल्या तेलासारखी त्यांची संपत्ति भर-भर जळून गेली—आणि शेवटीं उरला अंधार !

आमचे शेजारी कैलासबाबू हे या बडया वैभवसागराचे शेवटचे बिंदू. ते वयांत यायच्या आंतच त्यांच्या कुटुंबाची संपत्ति संपुष्टांत आली होती. त्यांचे वडील वारले, तेव्हां उत्तरक्रियेचा भडक उधळ-पट्टीचा विधि झाला तेवढा, आणि त्यानंतर—नादारी !

कर्जवाम वारण्यासाठीं सारी जिंदगी विकली गेली. सारं देणं भागवून जी कांहीं तुटपुंजी शिल्लक राहिली तिच्यावर पूर्वींच्या इतमामांत राहणें अशक्यच होतें.

नैनजोर सोडून कैलासबाबू कलकत्त्याला येऊन राहिले. या

उतरत्या काळाचा निरोप घेऊन त्यांचा मुलगा हें जग सोडून गेला. त्यांची लहान मुलगी तेवढी उरली.

आम्ही कलकत्त्यांतले कैलासबाबूंचे शेजारी. गंमत ही, कीं आमच्या कुळाचा इतिहास मात्र कैलासबाबूंच्या कुळकथेहून अगदीं उलट. माझ्या वडिलांनीं सारा पैसा स्वतःच्या निढळाच्या घामावर मिळविला. जरूरीपेक्षां पैहि अधिक खर्च करावयाची नाहीं असा त्यांचा बाणा असे. उधळपट्टी करावी आणि ' **बाबू** ' ही पदवी लावून घ्यावी असें त्यांना कधींच वाटलें नाहीं. याबद्दल माझ्यासारख्या त्यांच्या एकुलत्या एक मुलानें त्यांचे आभारच मानायला हवेत. त्यांनीं मला शिक्षण दिलें तें मात्र अगदीं उत्तमांतलें उत्तम. त्यामुळें माझा पाय जगांत पुढेंच पडत गेला. मी स्वतःच्या पायावर उभा राहणारा आहे, स्वयंसिद्ध आहे, याबद्दल मला कधींच कमीपणा वाटला नाहीं. रित्या भांडारांतल्या हातभर लांब वंशवृक्षापेक्षां भरल्या तिजोरींतल्या करकरीत नोटांचीच मातब्बरी मला अधिक वाटते.

कैलासबाबू आपल्या नष्ट झालेल्या गतवैभवाच्या पोकळ भांडवलावर समाजांत मान्यतेनें मिरविण्याचा व्यापार करतांना पाहून मला चीड येई ती याच कारणानं. मला असंहि वाटे कीं, माझ्या वडिलांनीं काबाडकष्ट करून पैसा मिळविला म्हणून हे गर्भश्रीमंत कैलासबाबू आमच्याकडे तुच्छतेनें पाहात असावेत.

बाकी हें माझ्या लक्षांत यायला पाहिजे होतं कीं माझ्याखेरीज कैलासबाबूंशीं रागाला येणारं एकहि माणूस आमच्यांत नव्हतं. त्यांच्याइतका अश्राप, निरुपद्रवी दुसरा माणूस शोधून काढणं म्हणजे कठीण काम. सुखाचे प्रसंग असोत कीं दुःखाचे; कैलासबाबूंचीं शेजारधर्माचीं

लहान लहान कामें कधीं चुकावयाचीं नाहींत. भोंवतालच्या सर्व समारंभांत, धार्मिक विधींत ते स्वत: होऊन भाग घेत. लहान असो, थोर असो, अगदीं सलगीनं ते त्याच्याकडे पाहून स्मित करीत. कुटुंबांतल्या घडामोडींबद्दल आपलेपणानं साऱ्यांची चौकशी करतांना त्यांना कधीं कंटाळा आला नाहीं.

रस्त्यांत कोणी मित्र भेटला कीं, कैलासबाबूंनीं त्याला अडविलंच. मग एखाद्या उलगडलेल्या रिळाच्या दोऱ्याप्रमाणें एकांतून एक असे त्यांचें प्रश्न घरंगळत यायचे—"वा ! वा ! दोस्त ! भेटलास ! फार आनंद झाला बुवा ! कशी काय तब्येत ! ठकि आहे ना ? शशी कसा आहे ? अन् दादा ?—ठीक आहेत ना ? आतांच कळलं बरं का, मधूच्या मुलाला म्हणे ताप आलाय—कसं असेल आतां तें पोर ? अन् आपले हरिचरणबाबूहि दिसले नाहींत बरेच दिवसांत—बरे असले म्हणजे झालं. अन् हो ! राखालची कशी काय खबरबात ? पोरीबाळीहि ठीक आहेत ना घरांतल्या ?"

कैलासबाबूंचे कपडे मोजकेच, पण कधीं त्यांच्यावर डाग दिसायचा नाहीं. सदरे, जाकीट, कोट, विजारींना ते रोज काळजीनें ऊन देत. उशीचा अभ्रा, रजई अन् त्यांचा नेहमींचा छोटा गालिचा उन्हांत ठेवून, पुसून झटकून सारं सामान ते घोडीवर नीट लावून ठेवीत. घरांतल्या वस्तु थोड्याच, पण त्या अशा कुशलतेनें मांडून ठेवलेल्या असत कीं, पाहणाऱ्याला वाटावं कीं आहे; अजून म्हाताऱ्याजवळ राखून ठेवलेली कांहींतरी माया खास आहे.

त्यांच्या घरांत नोकर—चाकर नसल्यानें कैलासबाबू थोडा वेळ आपलं घरच बंद करीत. मग आपल्या कपड्याला इस्त्री करणं, दुसरीं

जरूरीचीं कामं उरकणं वगैरे बाबती पार पाडून ते पुन्हां दारं उघडीत आणि मित्रमंडळींचें स्वागत करीत.

कैलासबाबूंची बहुतेक वडिलार्जित संपत्ति गेली खरी, पण कांहीं थोडे पिढ्यान् पिढ्या चालत आलेले डाग त्यांच्या जवळ अजून शिल्लक होते. एक अत्तरदाणी, एक गुलाबदाणी, एक लहान सोन्याची तबकडी, एक उंची शाल आणि एक समारंभाचा (पगडी-सहित) पोषाक. सावकारांच्या तडाख्यांतून त्यांनीं या वस्तू महामेहन-तीनें वांचवून सांभाळून ठेवल्या होत्या. योग्य वेळीं या वस्तूंचें प्रदर्शन करून, नैनजोरच्या बाबूंची प्रतिष्ठा शाबूत ठेवण्याचा ते यत्न करीत. कैलासबाबू स्वतः फार भिडस्त, पण एकदां आपल्या कुळाच्या लौकिकाचा प्रश्न निघाला म्हणजे मात्र बोलण्यांत त्यांची बेफाट स्तुति केलीच पाहिजे असं त्यांना खास वाटत असावं. त्यांचे मित्र या स्वभावदोषाकडे कौतुकानेंच पाहात आणि त्यांना उत्तेजनहि देत, कारण त्यायोगानें त्यांची चांगलीच करमणूक होई.

शेजारपाजारचे सारे लोक त्यांना ' ठाकुरदादा ' या नांवानें हांक मारायला शिकले. त्यांच्या घरीं शेजाऱ्यांचा घोळका जमे. सारे तासन् तास गप्पा छाटीत बसत. ठाकुरदादांना अशा प्रसंगीं खर्च पडूं नये म्हणून मधून मधून कोणी त्यांना तंबाखू आणून द्यावी, अन् म्हणावं, " ठाकुरदादा, ही तंबाखू तर जरा बघा ! आज सकाळींच गयेहून आली माझ्याकडे. ठेवा थोडी अन् कशी काय आहे तें सांगा. "

मग ठाकुरदादा ती घेत अन् ओढून म्हणत, " आहे ! छान आहे, पण आमच्या वेळच्यासारखी नाहीं. अहो नैनजोरला असतां अशी तंबाखू ओढलीय महाराजा ! काय किंमत असेल ओळखा !

नाहीं ! अहो औंसाला सोन्याची गिनी पडे—गिनी ! आहे कोणाला ओढून बघायची इच्छा ? कुठेंशी ठेवलीय खरी. हवी असली तर काढतों हुडकून—बोला ! ”

साऱ्यांना ठाऊक होतं कीं ही तंबाखू कधीं कोणाला मिळायची नाहीं. कोणी कुत्सितपणें मागितलीच तर ठाकुरदादांच्या कपाटाची किल्लीच हरवलेली असायची, नाहींतर त्यांच्या नोकरानें ती कुठें तरी डाव्या उजव्या हातानें ठेवलेली असायची. अन् मग ठाकुरदादा म्हणायचे, “ अस्सं होतं बघा ! नोकरांचा हात लागला म्हणजे कोणती वस्तु कुठें जाईल त्याचा नेम नाहीं. आतां हा गणेशाच बघा ! शंखोबा आहे नुसता ! पण जाऊं द्या. विचाऱ्याला हांकलून द्यायचं मन होत नाहीं बुवा आपलं. ” आणि कुळाच्या इभ्रतीसाठीं लागेल तितकं बोलून घ्यायची बिचाऱ्या गणेशाची नेहमींचीच तयारी असे. अशा प्रसंगीं गप्पाष्टकें झोडणाऱ्यांपैकीं कोणीतरी म्हणे, “ जाऊं द्या हो ठाकुरदादा ! उगीच त्या तंबाखूच्या नका नादीं लागूं. आतां आपण ओढतों आहोंत ती चालेल सध्यां. तुमची जुनी तंबाखू फार कडक पडेल. ”

असं ऐकलं म्हणजे ठाकुरदादांचा जीव भांड्यांत पडे. ते निवांतपणें खालीं बसत. गप्पाष्टकें पुन्हां चालू होत. सारे मित्र निघाले म्हणजे ठाकुरदादा त्यांना पोंचवायला उंबरठ्यापर्यंत जात, आणि म्हणत,—

“—अरे हो ! साऱ्यांनीं एकदां आमच्याकडे जेवायला आलं पाहिजे बुवा ! केव्हां येतां बोला ? ”

मग आमच्यांतला एखादा उत्तर देई, “ ठाकुरदादा ! सध्यां नको. हें बघा, एखादा नक्की दिवस ठरवूं या पुढंमागं. ”

"—ठीक ठीक" ठाकुरदादांचं उत्तर येई. "नाहींतरी आतां कोण उकडतं आहे. एक–दोन पाऊस येऊन गेले म्हणजे बरं. नाहीं तर आम्ही तुम्हांला खासं जड जेवण द्यावं, अन् या अशा हवेनं साऱ्यांना कसंसंच व्हायला लागावं यांत काय अर्थ आहे ?"

पाऊसकाळ आला तरी ठाकुरदादांना या जेवणाची कोणीच आठवण देत नसे. कोणी नको तो विषय काढलाच, तर दुसरा कोणी परभारेंच त्याला उत्तर देऊन टाकी, "अहो, पाऊस कसला पडतोय धो धो ! अन् जेवणाचं काय घेऊन बसलांत अशा वेळेला ? किती त्रांस होईल सारी व्यवस्था करायला. एकदां पावसाळा सरला म्हणजे मग बघूं या."

अशा रीतीनें हा खेळ सदाचा सुरू असे.

ठाकूरबाबूंच्या लौकिकाच्या मानानें त्यांचें राहतें घर अगदीं लहान पडे. आम्ही सारे याबद्दल हळहळत असूं. मित्रांनीं म्हणावं, "खरंच ठाकूरबाबू ! अडचणी काय कमी आहेत ? कलकत्त्यांत चांगलं घर मिळणं म्हणजे दुरापास्तच. अहो ! आम्ही इतकं वर्षं पाहात होतोंच, तुम्हांला साजेलसं घर. पण नांव नको ?" आणि असलं घर सांपडलं तरी ठाकुरदादांना सांगण्याचा मूर्खपणा कोण करणार ? मग ठाकुरदादा एक निःश्वास टाकून म्हणत, "जाऊं द्या झालं ! आहे या घरावरच भागवावं लागेल सध्यां." मोकळेपणानें हंसून ते म्हणत. "हें बघा ! आपल्या मित्रमंडळीला सोडून दुसरीकडे राहणं आपल्याला नाहीं पसंत पडायचं. तुम्ही सारे जवळ आहांत ना ? बस्स झालं—सारी भरपाई झाली जागेची."

या साऱ्या प्रकारांनीं माझ्या मस्तकाची तिडीक उठत असे. मी तरुण होतों. अन् तरुणपणीं मूर्खपणा हा सर्वांत मोठा गुन्हा वाटत

असतो माणसाला. तसं म्हटलं तर कैलासबाबूंची गणना मूर्खांत करतां आली नसती. साध्या व्यवहाराच्या बाबतींत तर सारे त्यांची सल्लामसलत विचारायला येत. पण एक नैनजोरचा विषय निघाला म्हणजे मात्र त्यांच्या बोलण्यांत कांहीं धरबंध राहात नसे. साऱ्यांना म्हाताऱ्याबद्दल कौतुक वाटे. कोणी विरुद्ध ' ब्र ' हि काढीत नसे. यामुळें ठाकुरबाबूंच्या गप्पा अगदीं कल्पनातीत फुगत चालल्या. कोणी वाटेल तितकी अतिशयोक्ति करून नैनजोरचा वैभवशाली इतिहास रंगविला तरी ठाकुरबाबू आपले गंभीरपणें माना डोलवीत. अशीं बोलणीं कोणाला खोटीं वाटतील,असें त्यांना स्वप्नांत देखील वाटत नसे.

कैलासबाबूंबद्दल मला जें वाटत असे तें कां अन् कशामुळें, याची छाननी करायला बसलों म्हणजे मग मला कळून येई कीं, या साऱ्या कारणापेक्षां निराळंच आणखी एक कारण या अप्रियतेच्या मुळाशीं होतं. आतां सांगतोंच सारा प्रकार.

मी घरचा सुखवस्तु असलों तरी शाळाकॉलेजांत उडाणटप्पूपणा केला नाहीं. ऐन विशी-पंचविशींतच मी कलकत्त्याचा एम. ए. झालों. माझ्या आचरणांत कोणाला नांव ठेवतां येण्याजोगं कांहीं नव्हतं. आतां मी दिसायलाहि देखणा होतों असं म्हटलं तरी तें खोटं म्हणायची प्राज्ञा नाहीं कोणाची. तेव्हां बंगालमधल्या ' उपवधू ' [illegible]णांत माझी गणना ' पहिल्या प्रतीचें स्थळ ' अशी होत होती, हें सांगायला नकोच ! मला स्वतःला या बाबतींत शंका नव्हती. लग्नाच्या बाजारांत आपली पुरेपूर किंमत वसूल करून घ्यायची असा माझा ठाम निश्चय ठरला होता. आपल्याला कशी वधू पाहिजे याचा मी मनाशीं विचार करूं लागलों म्हणजे अगदीं सुंदर, सुशिक्षित आणि

श्रीमंत बापाची एकुलती एक लेक; अशी मुलगी डोळ्यांपुढें उभी राहात असे. जवळून काय, दुरून काय, पोरींचा नुसता पूर वाहात होता माझ्याकडे. हुंड्याच्या मोठमोठ्या रकमा रोख मोजायला लोक तयार होते. मी या साऱ्या मागण्या माझ्या मनांत आढ्यतेनें धारवाडी कांटा लावून मोजीत बसे. पण या साऱ्यांत माझी सहचारिणी होण्याच्या योग्यतेची एकहि मुलगी मला आढळेना. कवि भवभूती-प्रमाणें मीहि म्हणूं लागलों—

उत्पद्यते मम च कोऽपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ॥

बाकी या आजकालच्या क्षुद्र समयांत, बंगालसारख्या टीचभर जागेंत अशी अतुलनीय व्यक्ति सांपडेल कीं नाहीं, याबद्दल मला संशयच होता. मुलींचे आईबापहि माझीं स्तुतिस्तोत्रं अनेक रागांत अन् अनेक छंदांत सतत गात होतेच.

अशा सांगून येणाऱ्या मुली पसंत पडोत न पडोत, त्यांच्या आई-बापांची स्तुति मात्र मला पसंत पडे. मला वाटूं लागलं कीं, आहेच मी इतका चांगला,मग ही स्तुति म्हणजे माझा जन्मसिद्ध हक्कच आहे.

ठाकुरदादांना एकुलती एक नात होती. मीं तिला अनेकदां पाहिलं, परन्तु तिला ‘ सुंदर ’ म्हणण्याचं धाडस माझ्यानं कधीं झालं नसतं. ती माझी सहचारिणी होण्याची शक्यता आहे असा विचार कधीं चुकूनहि माझ्या मनाला शिवला नव्हता. तें कांहीं असलं तरी कैलासबाबू कधीं तरी तिचा स्वीकार करण्याची मला प्रार्थना करतील अशी माझी खात्री होती. त्यांनीं अजून तसं केलं नव्हतं, हेंच माझं त्यांच्याविषयींच्या अप्रियतेचं गुप्त कारण.

ठाकूरबाबू आपल्या मित्रमंडळींत अभिमानानं म्हणत, " नैनजोरच्या बाबूंनीं कधीं कुणासमोर पदर पसरला नाहीं. पोरगी जन्मभर कुंवार राहिली तरी बेहत्तर, पण मी कुणाचे उंबरठे झिजवायला जाणार नाहीं. " त्यांच्या या उर्मटपणाचा मला राग येई. हा राग बराच वेळ माझ्या मनांत धुमसत होता. तरी स्तब्धच राहून तो सहन केला. माझ्या चांगुलपणाला मला डाग लावायचा नव्हता !

पण गर्जना झाली कीं तिच्याबरोबर वीज येतेच. त्याचप्रमाणें रागाबरोबर विनोदाची छटाहि माझ्या स्वभावांत येत असे. अर्थात् उगीच स्वतःच्या रागाचं शांतवन करण्यासाठीं म्हाताऱ्याला त्रास देण्याची माझी इच्छा नव्हती. पण एक दिवशीं असा गमतीचा बेत माझ्या डोक्यांत आला कीं, तो अंमलांत आणण्याखेरीज मला अगदीं राहवेना.

मीं मघांच सांगिलंच कीं, कैलासबाबूंचे कितीतरी मित्र त्यांना उगीच हरभऱ्याच्या झाडावर चढवीत. त्यांतला एक सरकारी सेवानिवृत्त अधिकारी होता तो ठाकूरबाबूंना सांगे कीं त्यांच्या अन् छोटया लाट साहेबांच्या¶ संभाषणांत त्यांचा हटकून उल्लेख होत असायचा. छोटे लाट म्हणत, " बस् ! बंगालमधलीं प्रतिष्ठित घराणीं दोनच. एक बरद्वानचे महाराज, अन् दुसरे नैनजोरचे बाबू. " हें भयंकर असत्य ठाकूरबाबूंना पूर्ण सत्याइतकं पटलं. त्यानंतर साऱ्या आल्यागेल्यांना ते ही गोष्ट अभिमानानं सांगत. बैठकींत या अधिकाऱ्यांची भेट झाली कीं बाबू त्याला हटकून विचारायचे— " अरे

¶ दिल्ली दरबारापूर्वी कलकत्ता ही राजधानी असतांना व्हाइसरॉय आणि बंगालचे गव्हर्नर दोघेहि कलकत्त्यांतच राहात. बडे लाट म्हणजे व्हाइसरॉय व छोटे लाट (लॉर्ड) म्हणजे बंगालचे गव्हर्नर.

हो ! विचारायचं राहिलंच; आपले छोटे लाट कसे आहेत ? ठीक ! हं आनंद आहे. बरं त्यांच्या मेमसाहेब ? छोटे बाबालोक ? आलबेल ! ठीक ठीक ! त्यांना भेटलांत म्हणजे सलाम सांगा. ”

आपण स्वतःच या छोटे लाट साहेबांना कधींतरी जाऊन भेटायचं असा कैलसबाबूंनीं बेत करून ठेवला होता. पण नैनजोरची पुराणी गाडी दुरुस्त होऊन, त्यांतून ठाकूरबाबू छोट्या लाटांच्या भेटीला जाईपर्यंत अनेक छोटे लाट अन् बडे लाट येऊन स्वधामाला जायची वेळ आली असती.

एक दिवशीं मीं ठाकूरदादांना बाजूला नेऊन सांगितलं, “ हें बघा काल मी ‘ लेव्ही ’ (दरबार) ला गेलों होतों, तेव्हां छोट्या लाटांनीं नैनजोरच्या बाबूंचं नांव काढलं. मीं सहज त्यांना सांगितलं, ‘अहो ! नैनजोरचे कैलासबाबू कलकत्त्यालाच आले आहेत सध्यां. ’ मी त्यांना असं सांगितलं मात्र, अन् त्यांना असं वाईट वाटलं सांगूं ? कलकत्त्यांत येऊन तुम्ही त्यांना भेटलां नाहींत, म्हणून सारा मानपान बाजूला ठेवून आज दुपारीं तेच स्वतः तुमची भेट घ्यायला येणार आहेत. ”

माझा हा कट दुसऱ्या कोणी क्षणांत ओळखला असता. दुसऱ्या कोणाबद्दल मीं हें कारस्थान केलं असतं तर कैलासबाबूंच्या ध्यानांत ही गोष्ट तेव्हांच आली असती. पण सरकारी अधिकाऱ्यांचं बोलणं, अन् स्वतःची अतिशयोक्ति, याच्या माऱ्यानंतर छोटे लाट आपल्या भेटीला यावेत यांत कांहीं विशेष होतंय असं त्यांना बिलकूल वाटलं नाहीं. ही बातमी ऐकल्यावर त्यांच्या जिवाची कोण धांदल, त्रेधा-तिरपीट ! या भेटीच्या प्रत्येक बाबतीबद्दल त्यांना चिंता वाटूं लागली.

मुख्य अडचण म्हणजे त्यांचं इंग्रजीचं अज्ञान. ही अडचण दूर कशी करायची ? मीं त्यांना दिलं सांगून "अहो ही अडचण नाहींच मुळीं. इंग्रजी न येणं हेंच खानदानीचं लक्षण आहे. अन् हें पाहा, गव्हर्नर आले कीं, त्यांच्याबरोबर त्यांचा 'दुभाषा' येणारच कीं. ही भेट पूर्णपणें खाजगी आहे असं त्यांनीं होऊन सांगितल्यानंतर उगीच नसत्या भानगडी हव्यात कशाला ?"

ऐन दुपारची वेळ. बहुतेक लोक कामावर गेलेले. बिनकामाचे झोंपा काढीत पडलेले. अशा वेळीं दोन घोड्यांची एक गाडी कैलासबाबूंच्या घरासमोर येऊन उभी राहिली. दोन पट्टेवाल्यांनीं जिन्याच्या तोंडाशीं येऊन ललकारी दिली. "बा अदब! छोटे लाट! निगा रखो मेहरबाऽन !"

जुनापुराणा, समारंभाचा पोषाख घालून कैलासबाबू सज्ज होतेच. त्यांचा चांगल्यांतला चांगला पोषाख चढवून वेळ साजरी करण्यासाठीं त्यांचा नोकर गणेशा त्यांच्या शेज़ारींच उभा होता. छोटया लाटांच्या आगमनाची द्वाही फिरल्याबरोबर कैलासबाबू धांवत, धापा टाकीत दारापर्यंत सामोरे पळत गेले. माझ्या एका मित्राला मी गव्हर्नरचें सोंग देऊन सजविलें होतें. त्यालाच अभिवादन करून, जमिनीपर्यंत लवून मुजरे करून, पाठमोरे न होतां, कैलासबाबू आपल्या खोलींत घेऊन आले. एका लाकडी खुर्चीवर त्यांनीं आपली जुनी मौल्यवान् शाल पसरून ठेवली होती. तिच्यावर आराम करण्याची त्यांनीं छोटया लाटांना विनंती केली.

दरबारी व्यवहाराची जुनीं भाषा म्हणजे उर्दू. या भाषेंत कैलास-बाबूंनीं एक लांबलचक फर्डें भाषण ठोकलें. त्यांच्या घराण्यात वैभ-

वाची शेवटली खूण जी सोन्याची तबकडी तिच्यावर सोन्याच्या मोहरांची एक चळत नजराणा म्हणून पुढें ठेवली. गणेशा बिचारा लाटांच्या खुर्चीमागें उभा होता. त्याच्या चेहऱ्यावरचा आदराचा भाव आतां भयंकर भीतींत परिवर्तित होत होता. हातांतल्या गुलाबदाणीनें त्यानें पाहुण्यांना जवळजवळ स्नानच घातलं, अन् मिनिटामिनिटाला अत्तरदाणींतून अत्तर चोपडलं ! हें चाललं असतांना साहेबबहादुरांचं घराण्याच्या इभ्रतीला शोभेलसं स्वागत या परक्या ठिकाणीं करतां येत नाहीं म्हणून कैलासबाबू पुन्हा पुन्हा आपल्या भाषणांतून दिलगिरी व्यक्त करीत होते.

दहा मिनिटंपर्यंत गव्हर्नरचं सोंग घेतलेला माझा मित्र नुसत्या माना डोलवीत मुकाट्यानें बसला होता. मग उठून तो परत निघाला. त्याच्या दोघां पट्टेवाल्यांनीं खुर्चीवरची शाल, अत्तरदाणी, गुलाबदाणी, सोन्याची तबकडी, मोहरा हें सारें सामान उचलून नीट गाडींत नेऊन ठेवलं. बिचाऱ्या कैलासबाबूंना वाटलें कीं, साऱ्या छोट्या लाटांची ही नेहमींची पद्धतच असावी.

हा सारा प्रकार मी शेजारच्या खोलींतून पाहात, कष्टानें हसूं दाबीत होतों. शेवटीं माझ्यानं हसल्याशिवाय अगदीं राहवेना, म्हणून मीं पलीकडच्या खोलींत धूम ठोकली.

तेथें एका कोपऱ्यांत एक तरुण मुलगी जशी अगदीं ऊर फुटेपर्यंत हुंदके देत, अंगाचा गोळा करून पडली होती. माझं फुटलेलं हसूं ऐकून ती रागानं उठून उभी राहिली. विजेसारखे तेजस्वी अन् काळेभोर डोळे माझ्याकडे रोखून ती रुद्ध कंठानें म्हणाली, “ सांगा, माझ्या आजोबांनीं तुमचं काय घोडं मारलंय तें तरी सांगून टाका

एकदां ! कां त्यांच्यामागं लागलांत असे ? कशाला आलांत इथं.... कां ?.... कां ? ''

तिळा पुढं बोलतां येईना. हातांनीं तोंड झांकून घेऊन ती हुंदके देऊं लागली.

माझं सारं हसूं एका क्षणांत नाहींसं झालं या साऱ्या प्रकारांत बेफाम विनोदाशिवाय दुसरं कांहीं असेल अशी मला कल्पनाहि नव्हती. अन् आतां पाहतों तों मी अजाणतेपणानं या मुलीच्या कोमल हृदयाला केवढ्या यातना दिल्या होत्या ! लाथेनें हाकललेल्या कुत्र्याप्रमाणें मी मान खालीं घालून त्या खोलींतून निमूटपणं बाहेर पडलों.

आतांपर्यंत कैलासबाबूंची कुसुम ही माझ्या मतानं लग्नाच्या बाजारांतली पडून राहिलेली अडगळ — निराशपणें एखाद्या नवऱ्याची आशा करीत बसलेली घोडनवरी ! ! पण आतां मला कळून आलं कीं, त्या घराच्या कोपऱ्यांत एका माणसाचं हृदय धडधडत होतं.

सारी रात्र मला झोंप आली नाहीं. माझ्या मनांत वादळ उठलं होतं. दुसऱ्या दिवशीं भल्या पहाटेस गोळा केलेला सारा चोरीचा माल घेऊन मी कैलासबाबूंच्या बिऱ्हाडीं गेलों. गुपचुप गणेशाच्या स्वाधीन साऱ्या वस्तु कराव्यात, अन् मोकळं व्हावं, असा माझा बेत होता. मी दाराशीं जरा थांबलों. खालीं कोणीच दिसलं नाहीं, म्हणून मी वरच्या मजल्यावर कैलासबाबूंच्या खोलीकडे वळलों. सज्जांत कुसुम मोठ्या मायेनं आजोबांना म्हणत होती, “ दादा ! छोटे लाट साहेब काल तुमच्याशीं काय काय बोलले तें सारं सांगा बरं मला. अगदीं शब्द नि शब्द सांगा. कांहीं गाळूं नका. केव्हां एकदां मी तें सारं ऐकतेंय् असं झालंय मला. ''

मग काय ? दादांना आणखी उत्तेजनाची जरूरच नव्हती. त्यांच्या चेहऱ्यावरून अभिमान नुसता ओसंडून चालला होता. नैनजोरच्या थोर घराण्याबद्दल छोटे लाट काय काय बोलले, तें सारं काल्पनिक वर्णन ते रंगून करीत होते. बिचारी प्रेमळ कुसुम म्हाताऱ्या आजोबाला समाधानाचं सुख देण्यासाठीं आपलं सोंग हुबेहूब वठवीत होती. त्यांच्या पायाशीं बसून, अगदीं उत्सुकपणें तिनें आपली दृष्टि कैलासबाबूंच्या चेहऱ्याकडे रोखली होती.

या दृश्यानें माझ्या काळजाला चटकाच बसला. माझ्या डोळ्यांना टचकन् पाणी आलं. कैलासबाबूंची सारी हकीकत सांगून होईपर्यंत मी बाजूच्या बोळकंडींत उभा राहिलों. ते बाहेर पडल्यानंतर मीं सारं सामान नेऊन कुसुमसमोर ठेवलं आणि शब्दहि न बोलतां परत गेलों.

त्याच दिवशीं संध्याकाळीं मी कैलासबाबूंना पुन्हा जाऊन भेटलों. आतांपर्यंत हल्लींच्या नव्या चालीरीतीप्रमाणें वागून, मी कैलासबाबूंना कधीं नमस्कारहि करीत नसे. आज मात्र मी वाकून त्यांच्या पायांना स्पर्श केला. कैलासबाबूंना खास वाटलं असावं कीं, गव्हर्नरच्या भेटीमुळें मिळालेला मोठेपणा या माझ्या नव्या नम्रतेच्या मुळाशीं असावा. यामुळें त्यांना फार समाधान वाटलें, हें मात्र निश्चित. शांति-सौख्याचें तेज त्यांच्या डोळ्यांतून ओसंडत होतें.

बैठकींत हळूहळू कैलासबाबूंचे मित्र एकत्र जमूं लागले. कालच्या लाट साहेबांच्या भेटीचें वर्णन जादा तिखटमीठ लावून सांगायला त्यांनीं पुन्हा सुरुवात देखील केली.

असाच किती तरी वेळ गेला. हळूहळू बैठकींतले लोक उठून जाऊं लागले. मी एकटा राहिल्यावर नम्रपणें म्हणालों, “ आपल्या-

सारख्या थोर कुळाशीं सोयरीक करण्याच्या मानाला मी पात्र नाहीं हें मला कळतंय. तरी पण आपली संमति असल्यास.... ''

अशा प्रकारें लग्नाची मागणी मी पुढें मांडतांच कैलासबाबूंच्या आनंदाला पारावार उरला नाहीं. मला मिठी मारून ते उद्गारले, " मी आपला एक गरीब माणूस आहें. एवढं थोर भाग्य माझ्या वांट्याला येईल असं स्वप्नांत देखील मला वाटलं नव्हतं ! ''

—बाकी आपण गरीब आहोंत याची जन्मांत पहिली अन् शेवटची कबुली कैलासबाबूंनीं दिली ती या वेळींच. त्याप्रमाणेंच, नैनजोरच्या बाबूंच्या लौकिकाची त्यांना जन्मांत कधीं विस्मृति झाली असेल तर, तीहि पहिल्यानंच अन् शेवटूनच, फक्त या एकाच क्षणांत ! !

समाप्त

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 2866
विभाग बा.बा
क्रमांक 9938
नों. दि. 3-–-69

म. के. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. क्र. 25504 नों. दि ....
वि. बा.वा. क. ....

प्रथमावृत्ति १९४६ द्वितीयावृत्ति १९५६

मुद्रक व प्रकाशक : दामोदर त्र्यंबक जोशी, बी. ए. (टिळक)
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव, पुणें २.

IRBK-0102504

IRBK-0102504